# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 29 ) 15th July 2004 ( No :5


# M I N U T E S

**of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS'ASSOCIATION held at 12.00 noon on *SUNDAY, the***

***9th May, 2004 at***

**Smt. Kesharbai Lahoti Mahavidyalaya, Amravati.**

General Body of Nagpur University Teachers' Association met at 12.00 noon on Sunday, the 9th May, 2004 at Smt. Kesharbai Lahoti Mahavidyalaya, Amravati, Prof. B.T.Deshmukh, President was in the chair. The membership numbers of the members present at the meeting are as follows :-

0044, 0048, 0056, 0072, 0074, 0090, 0108, 0131, 0152, 0154, 0220, 0268, 0269, 0302, 0380, 0389, 0426, 0433, 0472, 0497, 0557, 0724, 0840, 0892, 1113, 1122, 1177, 1260, 1287, 1382, 1406, 1433, 1538, 1629, 1651, 1710, 1793, 1948, 1991, 2035, 2049, 2108, 2138, 2154, 2317, 2350, 2352, 2375, 2407, 2414, 2425, 2439, 2581, 2603, 2655, 2666, 2903, 2966, 2980, 3097, 3098, 3236, 3237, 3304, 3341, 3346, 3351, 3375, 3432, 3446, 3449, 3464, 3478, 3480, 3492, 3495, 3498, 3512, 3520, 3612, 3659, 3667, 3712, 3835, 3898, 3926, 3927, 3970, 4019, 4076, 4109, 4121, 4132, 4279, 4311, 4346, 4743, 4792

Agenda of the General Body meeting was circulated on pages 57 to 59 of 2004 NUTA Bulletin.

## ITEM NO. 355 :
## *CONFIRMATION OF MINUTES :*

**CONFIRMED** the minutes of the General Body meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on Sunday, the 30 th November, 2003 at Jagadamba Mahavidyalaya, Achalpur

*Notes :-*

*1) Copy of the minutes was Circulated on pages 113 to 117 of 2003 NUTA Bulletin.*

*2) Corrections, if any, were invited in the copy of the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association held at 12.00 noon on Sunday, the 30th November, 2003 at Jagadamba Mahavidyalaya, Achalpur, vide No.CIM/16 Dated 15th December, 2003 published on page 121 of 2003 NUTA Bulletin. No correction was received..*

## विषय क्रमांक. ३५५ (अ) :
## *प्रा. आर.एस.टिकले यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव*

प्रा. आर.एस.टिकले यांच्या दुःखद निधनाबद्दल प्रा.श्री. अनिल ढगे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला.** :-

एफ.ई.एस.गर्ल्स महाविद्यालय, चंद्रपूर येथील समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा.आर.एस.टिकले यांचे दिनांक १५.४.२००४ ला आकस्मिक निधन झाले. प्रा. टिकले गेल्या ४ वर्षापासून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य म्हणून कार्यभार पाहत होते. नुटाच्या चंद्रपूर जिल्ह्यातील कार्यात प्रा.टिकले यांचा अतिशय सक्रीय सहभाग होता. वयाच्या अवघ्या ४५ व्या वर्षी त्यांचे दुःखद निधन झाल्यामुळे संघटनेची हानी झाली असून त्यांच्या कुटूंबियांवर आघात झाला आहे. नुटाची ही आमसभा प्रा.टिकले यांच्या निधनाबद्दल शोक संवेदना व्यक्त करीत आहे.

शोक प्रस्ताव मांडणाऱ्या सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अध्यक्षांनी सुद्धा आपल्या भावना व्यक्त केल्या. सभेने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्याना आपली आदरांजली वाहिली. सम्मत केलेल्या शोकप्रस्तावाची प्रत संघटनेच्या वतीने सचिव शोकाकुल कूटूंबियांकडे पाठवतील असे अध्यक्षांनी सांगितले.

## ITEM NO. 356 :
## *APPROVAL TO THE ANNUAL REPORT :*

**CONSIDERED AND APPROVED** the Annual Report regarding the working of the Association for the calendar year ending on 31st December, 2003.

***Notes :***

*(i) As per Article VI (b) (iii) of the Constitution of NUTA, the Annual Report of the working of the Association was prepared by the Executive Committee (vide item No.2 of 2004) and was placed for the approval of the General Body.*

*(ii) The Copy of the Annual Report was circulated on page 60 to 62 of 2004 NUTA Bulletin*

*(iii) Secretary, Dr. E.H.Kathale presented the Annual Report on behalf of the Executive Committee.*

## ITEM NO. 357 :
## *APPROVAL TO THE ANNUAL BUDGET :*

**APPROVED** the Annual Budget of the Association for the Financial year commencing on 1st April, 2004.

***Notes :***

*(i) Prof. S.A.Tiwari, Treasurer, NUTA, presented the Budget on behalf of the Executive Committee.*

*(ii) The copy of the Budget was circulated on page No.60 of 2004 NUTA Bulletin.*

## ITEM NO.358 :
## *APPOINTMENT OF THE AUDITORS :*

**CONSIDERED AND APPROVED** the following resolution for the appointment of Auditors for the Financial year ending on 31st March, 2004 namely :-

**"C.R.Sagdeo & Co. Chartered Accountant "Prabha Niwas" Nagpur be appointed as auditor for the Financial year ending on the 31st March 2004"**

***Note :***

*(i) As per Article VII of the Constitution of NUTA the "General Body shall appoint auditors annually in the Annual Meeting of the Association."*

*(ii) The Executive Committee resolved to recommend the above resolution, (Vide item No. 4 of 2004) which was placed before the General Body for its approval.*

*(iii) Prof. S.A.Tiwari, Treasurer, on behalf of the Executive Committee, moved the resolution.*

## विषय क्रमांक. ३५९ :
## *महागाई भत्याचा काही भाग मूळ वेतनात समाविष्ट करणे*

कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा. एस.ए.तिवारी यांनी मांडलेला पुढील **प्रस्ताव सम्मत करण्यात आला. :-**

रुपयाची दर दिवसाला घसरत जाणारी क्रयशक्ती सावरून धरण्यासाठी मुळ वेतनावर महागाई भत्ता देण्याची व्यवस्था अनेक वर्षापूर्वी सुरु करण्यात आली. १ जानेवारी १९८६ या दिनांकाला संपूर्ण महागाई भत्ता मूळ वेतनात समाविष्ट केल्यानंतर पुढच्या ६ महिन्यात १ जुलै १९८६ ला वाढलेल्या ग्राहक निर्देशांकानुसार ४ टक्के महागाई भत्ता द्यावा लागला, तो १ जानेवारी १९९६ मध्ये १४८ टक्क्यावर गेला. १ जानेवारी १९९६ रोजीचा सारा महागाई भत्ता मूळ वेतनात समाविष्ट केल्यानंतरसुद्धा पुढच्याच १ जुलै १९९६ ला वाढलेल्या ग्राहक निर्देशांकानुसार ४ टक्के महागाई भत्ता द्यावा लागला, १ जानेवारी २००४ ला तो ५९ टक्क्यावर गेलेला आहे. ग्राहक निर्देशांकामध्ये होणाऱ्या वाढीनुसार "महागाई भत्ता ज्या ज्या वेळी मुळ वेतनाच्या ५० टक्के पेक्षा जास्त होईल त्या त्या वेळी मुळ वेतनाच्या ५० टक्के एवढी महागाई भत्त्यातील रक्कम मुळ वेतनाचा भाग म्हणून समाविष्ट करण्याची" ५ व्या वेतन आयोगाची शिफारस (अहवाल परिच्छेद १०५.११) केंद्र शासनाने स्वीकारली असून त्याप्रमाणे प्रत्यक्ष कारवाई करणारे केंद्राचे शासन आदेश १ मार्च २००४ रोजी निर्गमित झालेले आहेत.

केंद्र शासनाने नेमलेला वेतन आयोग केंद्राच्या शासकीय कर्मचाऱ्यांसाठी असतो हे खरे असले तरी, डिसेंबर ७७ मध्ये राज्य शासनाने जो धोरणात्मक निर्णय घेतला तो असा होता की, "**राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्या सुधारण्याकरिता राज्य शासनाकडून स्वतंत्र वेतन आयोग नियुक्त न करता केंद्र शासन जेव्हा जेव्हा केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी वेतन आयोग नियुक्त करील तेव्हा तेव्हा त्या वेतन आयोगाच्या शिफारशीवरील केंद्र शासनाचे वेतन विषयक निर्णय** (Decisions of the Central Government on the Commission's recommendations in regard to pay scales) **राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या तुलनीय प्रवर्गांना लागू करण्यात येतील. वेतन निश्चितीचे सूत्र देखील केंद्र शासनाप्रमाणे असेल.**"

**डिसेंबर ७७ मध्ये जो धोरणात्मक निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला, त्यामध्ये आज सुध्दा बदल झालेला नाही,** हे लक्षात घेता मूळ वेतनाच्या ५० टक्के एवढा महागाई भत्त्याचा भाग मूळ वेतनात वळता करणारे शासन आदेश तत्परतेने निर्गमित करण्यात यावेत अशी मागणी हे सभागृह करित आहे.

**Notes :-**

(i) Chapter 105 on "Compensation for Price Rise" from the report of the Fifth Central Pay Commission was printed on pages 45 to 48 of 2004 NUTA Bulletin.

(ii) Para 28 of the Speech made by the Central Finance Minister while presenting an Interim budget, for part of the year 2004-05 in Lok Sabha on 3rd Feb. 2004, was circulated on page 48 of 2004 NUTA Bulletin.

(iii) Office Memorandum issued by Government of India : Ministry of Finance, Department of Expenditure : New Delhi, dated the 1 March, 2004 regarding Merger of 50 % of Dearness allowance/Dearness Relief with basic pay/pension to Central Government employees/pensioners w.e.f. 1.4.2004 was circulated on page 48 of 2004 NUTA Bulletin.

## विषय क्रमांक. ३६० :
## *वरिष्ठ श्रेणीत ५ वर्षे सेवा झाली नसेल तर एकूण सेवा लक्षात घेऊन निवडश्रेणीत स्थाननिश्चिती करणे*

(अ) कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा. डॉ. डी.यु.पोच्छी यांनी विषयोक्त **प्रस्ताव मांडला :-**

(ब) प्रस्तावाला प्रा. एस.आर.सिरसाट यांनी पुढील **सुधारणा सुचविली.**:-

प्रस्तावाच्या शेवटच्या वाक्यात "ते तत्परतेने मागे घ्यावे" या शब्दांऐवजी "हा उल्लेख तत्परतेने मागे घ्यावा" हे शब्द दाखल करण्यात यावे.

(क) प्रा.एस.आर.सिरसाट यांनी सुचविलेली सुधारणा **सम्मत करण्यात आली.**

(ड) सुधारणेसह मूळ प्रस्ताव **सम्मत करण्यात आला** तो पुढील प्रमाणे:-

निवडश्रेणी देतांना वरिष्ठ श्रेणीत ५ वर्षे सेवा झाली नसेल तर एकूण सेवा लक्षात घेऊन निवडश्रेणीत स्थाननिश्चिती करावी अशी स्पष्ट तरतुद ११ डिसेंबर १९९९ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद १६ मध्ये नमुद आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या २४ डिसेंबर १९९८ च्या नोटीफीकेशनच्या परिच्छेद ७.८ मध्ये सुद्धा तसा स्पष्ट उल्लेख आहे. "जुन्या योजनेत एका श्रेणीतुन दुसऱ्या श्रेणीत जाण्याचा कालावधी मोठा होता तो आता कमी झाल्यामुळे सुरुवातीच्या संक्रमण काळात अशी स्थिती येवू शकते." असा स्पष्ट खुलासाही विद्यापीठ अनुदान आयोगाने २४ डिसेंबर १९९८ च्या नोटीफीकेशनमध्येच केलेला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने ९ ऑक्टोबर २००३ च्या पत्रान्वये ही भूमिका पुन्हा स्पष्ट केलेली आहे. असे असतांना "त्याची निवडश्रेणीमधील स्थाननिश्चिती मात्र ..... वरिष्ठ श्रेणीत ५ वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतरच करण्यात येईल." असे मूळ शासन निर्णयाशी (११.१२.१९९९) संपूर्णपणे विसंगत व विरोधी आदेश असलेले एक परिपत्रक शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांनी दिनांक १४ फेब्रुवारी २००२ रोजी निर्गमित केलेले असून त्यामुळे अनेक शिक्षकांना या लाभापासून वंचित रहावे लागले आहे. शासन निर्णयाच्या विरोधात परिपत्रके काढण्याच्या उच्च शिक्षण संचालकांच्या या वृत्तीचा तीव्र धिक्कार करण्यात येत असून त्यांनी हा उल्लेख तत्परतेने मागे घ्यावा. अशी मागणी करण्यात येत आहे.

Notes :-

(१) "शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांनी शासन निर्णयाच्या विरोधात काढलेले "वरिष्ठ श्रेणीमधून निवडश्रेणी मध्ये जाण्यासाठी सरसकट वरिष्ठ श्रेणीतील ५ वर्षाची सेवा आवश्यक ठरविणारे" दि. १४ फेब्रुवारी २००२ रोजीचे आदेश तत्परतेने दुरुस्त करण्याबाबत" या विषयावर :

(i) संघटनेच्या सचिवांनी व सहसचिवांनी मा. संचालक, उच्च शिक्षण यांना सादर केलेले दिनांक ५ मार्च २००३ रोजीचे निवेदन (सहपत्र : एक) सन २००४ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ६३ व ६४ वर प्रसृत करण्यात आले होते.

(ii) संघटनेच्या अध्यक्षांनी मा. संचालक उच्च शिक्षण यांना सादर

**No.CIM/17 : : Dated 15th July, 2004**

**CORRECTION**
**in the copy of the Minutes**
**of the General Body Meeting of NUTA**

Copy of the Minutes of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION held at 12.00 noon on Sunday, the 9th May, 2004 at Smt. Kesharbai Lahoti Mahavidyalaya, Amravati, is circulated in this NUTA Bulletin.

If you propose to suggest any correction to the Minutes, it may be pointed out to the Secretary (Prof.E.H.Kathale, Secretary, NUTA, N-162, Reshim Bagh, Nagpur-440 009.) by letter within 10 days from the date of posting of this Bulletin.

It will not be possible for the corrections received after the due date to be included in the List of corrections for consideration.

Please send one copy of your letter to Prof. B.T.Deshmukh, President NUTA, 3 Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati 444 604.

**Dr. E.H. Kathale**
*Secretary NUTA*

*******

केलेले दिनांक ६ मार्च २००३ रोजीचे निवेदन (सहपत्र : दोन) सन २००४ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ५८ वर प्रसृत करण्यात आले होते.

(iii) संघटनेच्या अध्यक्षांनी दिनांक ६ मार्च २००४ रोजी पाठविलेल्या पत्राला मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांनी उत्तरादाखल दिनांक ८.४.२००४ रोजी पाठविलेले पत्र (सहपत्र : तीन) सन २००४ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ६४ वर प्रसृत करण्यात आले होते.

### विषय क्रमांक. ३६१ :
### *कंत्राटी पद्धतीच्या नेमणूकाबाबत शासननिर्णयाच्या विरोधात उच्च शिक्षण संचालक यांनी अटी लादणे*

(अ) कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा. डॉ. एकनाथ कठाळे यांनी मांडलेला पुढील प्रस्ताव सभागृहाच्या परवानगीने **मागे घेण्यात आला** :-

"कंत्राटी पद्धतीने वरील नियुक्त्या जास्तीत जास्त २ वर्षे किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग, विद्यापीठासाठीच्या/विद्यापीठाने महाविद्यालयासाठी स्थापित केलेल्या विहित निवड समितीमार्फत निवड झालेला नियमित उमेदवार उपलब्ध होणे यापैकी जे अगोदर घडेल तेवढ्या कालावधीसाठी असतील. त्यानंतर या कंत्राटी नियुक्त्या आपोआप संपुष्टात येतील. " अशा प्रकारचा स्पष्ट उल्लेख २५ जुलै २००२ च्या शासननिर्णयामध्ये आहे. १९ जुलै २००३ च्या शासननिर्णयामध्ये "ही पदे भरण्याच्या संदर्भात दिनांक २५ जुलै २००२ मधील अटी लागू राहतील" असा स्पष्ट उल्लेख आहे. असे असतांना उच्च शिक्षण संचालनालयाने ना हरकत प्रमाणपत्र देतांना त्यामध्ये शासन निर्णयाशी विसंगत "वरील नियुक्त्या एका शैक्षणिक वर्षासाठी राहतील" असा मजकूर दाखल केला आहे. शासननिर्णयाच्या विरोधात अटी लादण्याच्या उच्च शिक्षण संचालकांच्या या कृतिचा तीव्र निषेध करण्यात येत असून ही कृति तीव्र असंतोषाला आमंत्रण देणारी आहे हेही नमुद करण्यात येत आहे.

(ब) कंत्राटी पद्धतीने पदे भरण्याबाबतच्या पुढील कागदपत्रांची **नोंद घेण्यात आली** :- "कंत्राटी पद्धतीच्या नियुक्त्या संदर्भात ना हरकत प्रमाणपत्र देतांना शिक्षण संचालनालय (उ.शि.) यांनी लादलेली शासन निर्णयाशी विसंगत व शासन निर्णयाच्या विरोधातील अट रद्द करण्याबाबत" या विषयावर :-

(i) २५ शिक्षकांनी दिनांक १२ मार्च २००४ रोजी संचालक उच्च शिक्षण यांना पाठविलेले निवेदन (सहपत्र : चार)

(ii) संघटनेच्या अध्यक्षांनी मा. संचालक उच्च शिक्षण यांना सादर केलेले दिनांक १५ मार्च २००४ रोजीचे निवेदन (सहपत्र : पाच)

(iii) संघटनेच्या अध्यक्षांनी दिनांक १५ मार्च २००४ रोजी पाठविलेल्या पत्राला मा. शिक्षण संचालक उच्च शिक्षण यांनी दिनांक ८.४.२००४ रोजी उत्तरादाखल पाठविलेले पत्र (सहपत्र : सहा)

(उपरोक्त (i), (ii) व (iii) अनुक्रमे सन २००४ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ क्रमांक ६५ व ६६ वर प्रसृत करण्यात आले होते.)

(क) प्रा. डॉ. एकनाथ कठाळे यांनी मांडलेला पुढील पर्यायी प्रस्ताव विचारात घेण्यात आला व **सम्मत करण्यात आला.** :-

मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) यांनी दिनांक ८.४.२००४ रोजी विधानपरिषद सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना पत्र लिहून कंत्राटी पद्धतीच्या नेमणूकाबाबत शासननिर्णयाच्या विरोधात निर्णय त्यांच्या कार्यालयातून निर्गमित झाला होता ही गोष्ट प्रांजळपणाने कबूल केली व ती चूक दुरुस्त करण्याचे आदेश तत्परतेने क्षेत्रिय अधिकाऱ्यांना दिले याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत.

मात्र याबाबत अशीच चूक शासकीय महाविद्यालयातून नेमण्यात आलेल्या कंत्राटी शिक्षकांच्या बाबतीत झाली आहे. वस्तुतः तेच शासननिर्णय व त्याच तरतुदी शासकीय महाविद्यालयातील शिक्षकांना सुध्दा लागू आहेत. तेथे सुध्दा ती चूक तत्परतेने दुरुस्त करण्यात यावी अशी विनंती ही सभा मा. उच्च शिक्षण संचालकांना करीत आहे. चूक तत्परतेने दुरुस्त झाली नाही तर शासकिय महाविद्यालयातील अशा शिक्षकांचा कार्यकाळ ३० एप्रिल २००४ रोजी संपुष्टात येईल व तसे होऊ नये म्हणून उच्च शिक्षण संचालनालयातील भ्रष्टाचाराच्या मांडवाखालून जाण्याच्या अपप्रसंगाला त्यांना तोंड द्यावे लागेल किंवा मा. उच्च न्यायालयाचे किंवा 'मॅट'चे दार ठोठाविण्याचा प्रसंग या शिक्षकांवर येईल मात्र संचालकांनी तत्परतेने दुरुस्ती केल्यास असा प्रसंग अथवा अपप्रसंग सहज टाळता येण्यासारखा आहे.

### विषय क्रमांक. ३६२ :
### *प्रा.बी.बी.हेडा यांचे अभिनंदन*

(अ) कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा.डॉ. अनिल सोमवंशी यांनी मांडलेला पुढील प्रस्ताव **सम्मत करण्यात आला** :-

दीर्घ काळपर्यंत महात्मा गांधीचे स्वीय सचिव म्हणून कार्य केलेल्या श्री. प्यारेलाल ह्या अधिकारी व्यक्तीच्या लेखणीतून उतरलेल्या "महात्मा गांधी लास्ट फेज" या गांधीजीवरील चरित्र ग्रंथाचा मराठी अनुवाद "नुटा बुलेटीन"चे माजी संपादक, संघटनेचे एक ज्येष्ठ नेते, मराठीचे सेवानिवृत्त प्राध्यापक श्री. ब्रिजमोहन हेडा यांनी "महात्मा गांधी अखेरचे पर्व" या शिर्षकाखाली चार खंडात प्रसिद्ध केल्याबद्दल **ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.** महात्मा गांधीच्या जीवन चरित्राची माहिती उपलब्ध करुन देणारी पुस्तके मराठीत कमी आहेत अशातला भाग नाही. परंतु गांधीजीचे स्वीय सहाय्यक म्हणून कार्य केलेल्या, तसेच अनेक वर्षे 'हरिजन' या साप्ताहिकाचे संपादकपद भुषविलेल्या, खुद्द गांधीजी हयात असतांना व त्यानंतरही 'यंग इंडिया' व 'हरिजन' मधून केलेल्या लेखनातून, तसेच स्वतंत्र ग्रंथातून केलेल्या लिखाणामुळे गांधीजींच्या जीवनावरील व त्यांच्या तत्त्वज्ञानावरील एक विश्वसनीय व खात्रीलायक भाष्यकार हा लौकिक मिळविलेल्या, प्यारेलाल यांच्या सारख्या सिद्धहस्त लेखकाच्या लेखणीतून उतरलेल्या "महात्मा गांधी लास्ट फेज" या मूळ इंग्रजी ग्रंथाचा मराठी मध्ये अनुवाद उपलब्ध नव्हता ही फार मोठी उणीव श्री. हेडा यांच्या मेहनतीने भरून निघालेली आहे याचा **या सभागृहाला मनापासून आनंद वाटतो.** "पराग एजन्सिज, अकोला" या प्रकाशकांनी हे चारही खंड प्रकाशित केले असून नुकतेच ३० जानेवारी २००४ रोजी गांधीजींच्या पुण्यतिथीच्या दिवशी सेवाग्राम येथे त्यांचे समारंभपूर्वक प्रकाशनही झाले आहे. वयपरत्वे प्राध्यापक या नात्याने सेवानिवृत्त झाल्यावर व अनुषंगाने बुलेटिन व संघटनेच्या कामातून निवृत्ती स्वीकारल्यानंतर प्रा. ब्रिजमोहन हेडा यांनी हाती घेतलेले अनुवादाचे हे काम पुढची अनेक वर्षे अतिशय मेहनतीने व कष्टाने पूर्णत्वाला नेले. मराठी साहित्याच्या दालनात ही सेवा रुजू करतांना सेवानिवृत्तीनंतरच्या कार्यकालाच्या उत्तम उपयोगाचा एक सुदृढ नमुनाच त्यांनी शिक्षकांच्या समोर ठेवला आहे. **अशी या सभागृहाची भावना आहे.**

(ब) प्रस्ताव सम्मत करण्यात आल्यानंतर सभागृहात उपस्थित असलेले प्रा.बी.बी.हेडा यांनी व्यासपीठावर यावे अशी अध्यक्षांनी विनंती केली. टाळ्यांच्या गजरात प्रा.ब्रिजमोहन हेडा हे स्थानापन्न झाल्यावर अध्यक्षांनी संघटनेच्या वतीने पुष्पहार अर्पण करुन त्यांचे अभिनंदन केले.

अभिनंदन प्रस्तावाला उत्तर देतांना प्रा. ब्रिजमोहन हेडा यांनी प्रस्तावक, कार्यकारीणी आणि आमसभेचे आभार मानले.

"नागपूर आणि अमरावती विद्यापीठातील प्राध्यापकांच्या लेखनासाठी पारितोषिक देता यावे म्हणून एक निधी उभारण्यात यावा या पारितोषकासाठी विषयाचे बंधन नसावे असा प्रस्ताव मान्य झाला आणि असा निधी उभारावयाचे ठरविण्यात आले तर १०,००० रु. निधी आपण स्वतः त्याकामासाठी देऊ" असे प्रा. हेडा यांनी जाहीर केले. प्रा.ब्रिजमोहन हेडा यांनी जाहीर केलेल्या निर्णयाबाबत संघटनेच्या वतीने अध्यक्षांनी त्यांचे आभार मानले. "उक्त पारितोषिकाबाबतची तपशीलवार योजना प्रा.हेडा यांनी तयार करुन दिल्यास ती कार्यकारी मंडळासमोर मान्यतेसाठी ठेवून त्या योजनेची अम्मलबजावणी करण्याचा विचार करता येईल" असेही अध्यक्षांनी सांगितले.

### विषय क्रमांक : ३६३
### सभा व्यवस्थेबद्दल आभार :

कार्यकारी मंडळाच्या वतीने सहसचिव डॉ. अनिल सोमवंशी यांनी महाविद्यालयाच्या व्यवस्थापन मंडळाचे, अध्यक्ष व सचिव तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य व स्थानिक शाखेच्या इतर प्राध्यापकांनी, जिल्हा नुटाचे अध्यक्ष, सचिव व सदस्य यांनी, ही सभा यशस्वी करण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल आणि दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपुर्वक **आभार** मानले. शेवटी सर्व उपस्थित सदस्यांचे **आभार** मानून सभा संपली असे अध्यक्षांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| स्वा / **बी.टी.देशमुख** | स्वा / **एकनाथ कठाळे** |
| ***अध्यक्ष*** | ***सचिव*** |

*******

# सरकारी, निमसरकारी कर्मचारी व शिक्षकांना केंद्रीय दराने महागाई भत्ता देण्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : गुरुवार, दिनांक १० जून २००४ : दुसरे अधिवेशन, २००४*

**प्रा.बी.टी.देशमुख, व्ही.यू. डायगव्हाणे, वसंतराव खोटरे प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, जी.एल.अैनापुरे** यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

**श्री.बी.टी.देशमुख** (अमरावती विभाग पदवीधर ) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छतो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत केंद्र शासनाच्या दराने महागाई भत्ता देण्याचा धोरणात्मक निर्णय पुन्हा घेतल्याचे दिनांक ११ डिसेंबर, २००३ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक ३७२३१ वरील अनुपूरक चर्चेत घोषीत केल्यानंतरसुद्धा विद्यमान ५५ टक्क्यांपुढील ६ टक्क्यांची केंद्र शासनाने लागू केलेली महागाई भत्त्यातील वाढ अजूनही लागू न होणे मा.वित्त मंत्र्यांच्या अंदाजपत्रकीय भाषणाच्या परिच्छेद ९२ मध्ये ही वाढ मंजूर करण्यात आली असून अर्थसंकल्पात पुरेशी तरतुद करण्यात आलेली आहे असा उल्लेख असूनही ती वाढ निश्चित कोणत्या तारखेपासून लागू करण्यात येणार ही बाब स्पष्ट नसणे, कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात ५० टक्के महागाई भत्त्याचा समावेश करण्याबाबतची मागणी मान्य होणे, मात्र त्याची अंमलबजावणी दुष्काळाची तीव्रता कमी झाल्यानंतर करण्याची घोषणा, मा. वित्तमंत्र्यांच्या भाषणाच्या इंग्रजी प्रतीमध्ये ह्या बाबी दोन वेगवेगळ्या परिच्छेदांमध्ये असणे, मात्र मराठी प्रतीमध्ये एकाच परिच्छेदामध्ये दोन्ही बाबी असणे, "राज्य शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना १ जून, २००४ पासून केंद्र शासनाच्या दराप्रमाणे वाढलेला ६ टक्के महागाई भत्ता अदा करण्यात येईल व १ जुलै, २००४ पासून ५० टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात समाविष्ट केला जाईल. असे स्पष्ट आश्वासन मा. वित्त मंत्र्यांनी दिल्याचे महाराष्ट्र राज्य शासकीय कर्मचारी महासंघाने दिनांक २७ मे, २००४ रोजी काढलेले प्रसिद्धी पत्रक, या दोनही बाबींच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या तारखेविषयी निर्माण झालेला संभ्रम व त्याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया "

**श्री. दिलीप देशमुख (वित्त राज्यमंत्री)** : सभापती महोदया, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**श्री. जयंत पाटील, मा. वित्त मंत्री यांचे निवेदन**

शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत केंद्र शासनाच्या दराने महागाई भत्ता देण्याचा धोरणात्मक निर्णय पुन्हा घेतल्याचे दिनांक ११ डिसेंबर, २००३ रोजी तारांकित प्रश्न क्र. ३७२३१ वरील अनुपूरक चर्चेत घोषित केल्याचे मा. विधान परिषद सदस्यांनी लक्षवेधी सूचनेमध्ये नमुद केले आहे. तथापि उपरोक्त दिवशी सदरहू प्रश्न चर्चेला आल्याचे आढळून येत नाही.

५५ टक्क्यांपुढील ६ टक्क्यांची केंद्र शासनाने लागू केलेली महागाई भत्त्यातील वाढ देण्याचे, महाराष्ट्र शासनाचा सन २००४-२००५ या वर्षाचा अतिरिक्त अर्थसंकल्प विधानसभेत सादर करतांना, शासनातर्फे जाहीर

## खर्चाचे पुरक विवरणपत्र : २००४-२००५

खर्चाचे पुरक विवरणपत्र भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०५ अन्वये विधानमंडळास सादर करावे लागते. वित्त विभागामार्फत हे विवरणपत्र सादर केले जाते. खर्चाच्या ह्या पुरक विवरणपत्रात पुढील प्रयोजनांसाठी आवश्यक असलेल्या अनुदानाच्या संबंधातील मागण्या किंवा विनियोजने यांचा समावेश करण्यात येत असतो :- (अ) विधानमंडळाकडून मान्यता मिळण्याच्या अपेक्षेने शासनाने मंजूर केलेल्या बाबींच्या संबंधात (एक) आकस्मिकता निधीत त्यातून भागविण्यात आलेल्या खर्चाइतकी परतफेड करण्यासाठी आणि (दोन) वर्षाच्या उर्वरित कालावधीतील ह्या बाबींवरील जादा संभाव्य खर्चाकरिता चालू वित्तीय वर्षात आवश्यक असलेल्या तरतुदी; (ब) ज्यासाठी विधानमंडळाची विशिष्ट मान्यता घेणे आवश्यक आहे अशा "नवीन कामांसाठी" असलेल्या तरतुदी धरून आवश्यक असल्याचे दिसून आलेल्या अतिरिक्त तरतुदी; (क) चालू वित्तीय वर्षात ज्या "नवीन कामांच्या" बाबींवर कोणताही जादा खर्च तातडीने करावा लागणार नाही किंवा ज्यावरील संपूर्ण जादा खर्च वर्षातील मंजूर अनुदानामधील अपेक्षित बचतीतून भागविणे शक्य आहे, अशा प्रकारच्या बाबींच्या संबंधातील लाक्षणिक मागण्या;

### *महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०५ अन्वये विधानमंडळास सादर केले त्याप्रमाणे*

*(१) वर्ष : २००४-२००५ (२) सभागृहाला सादर केल्याचा दिनांक : ८ जून २००४ (३) विवरणपत्राच्या मराठी प्रतीमधील पृष्ठ क्रमांक : ६२*
*(४) विभाग : वित्त विभाग (५) पुरक मागणी क्रमांक : जी-४ व जी-६ (६) बाब क्रमांक : १११ व ११२*

### *पुरक मागणी क्रमांक : जी-४ बाब क्रमांक : १११*

***शासनाचे स्पष्टीकरणात्मक निवेदन :- बाब क्रमांक १११ :*** ५० टक्के महागाई भत्ता मूळ वेतनामध्ये विलीन करण्याच्या निर्णयासंबंधात अतिरिक्त तरतूद रु. ६,६९,४६,००,०००—दत्तमत) — राज्य शासनाने कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात ५० टक्के महागाई भत्ता विलीन करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय जुलै २००४ पासून कार्यान्वित करावयाचा आहे. चालू वर्षामधील अपेक्षित खर्च रु. ६६९.४६ कोटी एवढा काढण्यात आला आहे. या प्रयोजनासाठीचा अंतिम वार्षिक आवर्ती खर्च रु. १००४.२० कोटी एवढा येईल म्हणून चालू वर्षाकरिता रु. ६,६९,४६,००,००० ची अतिरिक्त तरतुद करणे आवश्यक आहे. म्हणून, आवश्यक ती तरतुद करण्यासाठी आणि हा खर्च विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी रु. ६,६९,४६,००,००० ची पुरक मागणी सादर केली आहे.

### *पुरक मागणी क्रमांक : जी-६ बाब क्रमांक : ११२*

***शासनाचे स्पष्टीकरणात्मक निवेदन :- बाब क्रमांक ११२ :*** ५० टक्के महागाई भत्ता मूळ निवृत्तीवेतनामध्ये विलीन करण्याच्या निर्णयासंबंधात अतिरिक्त तरतूद रु. २,३६,२४,००,०००—दत्तमत) — राज्य शासनाच्या व इतर निवृत्तीवेतनधारकांच्या बाबतीत ५० टक्के महागाई वाढ मूळ निवृत्तीवेतनामध्ये विलीन करण्याचे शासनाने ठरविले आहे. हा निर्णय जुलै २००४ पासून कार्यान्वित करावयाचा आहे. चालू वर्षामधील अपेक्षित खर्च रु. २३६.२४ कोटी एवढा काढण्यात आला आहे. या प्रयोजनासाठीचा अंतिम वार्षिक आवर्ती खर्च रु. ३५४.३६ कोटी इतका येईल म्हणून चालू वर्षाकरिता रु. २,३६,२४,००,००० ची अतिरिक्त तरतुद करणे आवश्यक आहे. म्हणून, आवश्यक ती तरतुद करण्यासाठी आणि हा खर्च विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी रु. २,३६,२४,००,००० ची पुरक मागणी सादर केली आहे.

करण्यात आलेले आहे. ही वाढ लागू करण्याबाबत आवश्यक ते आदेश लवकर निर्गमित करण्यात येतील.

कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात ५० टक्के महागाई भत्त्याचा समावेश करण्याबाबतीची घोषणा **इंग्रजी प्रतीमध्ये दोन वेगळ्या परिच्छेदांमध्ये व मराठी प्रतीमध्ये एकाच परिच्छेदामध्ये असणे याचे कारण मराठी आवृत्तीतील परिच्छेद ९२ मधील उप परिच्छेदास ९२.१ असा क्रमांक देण्याचे अनवधानाने राहून गेले आहे.**

महाराष्ट्र राज्य शासकीय कर्मचारी महासंघ यांनी दिनांक २७.५.२००४ रोजी काढलेले प्रसिद्धीपत्रक ही कर्मचारी महासंघाच्या अखत्यारीतील बाब आहे. शासनाचा याबाबतचा निर्णय लवकरच घेण्यात येईल

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदया, मागच्या वेळेला या विषयावर अनुपूरक चर्चा २५ जुलै २००३ रोजी झालेली होती. मी स्वतः असा प्रश्न विचारलेला होता की, "माझा पुढचा प्रश्न असा आहे की, राज्य व केंद्र शासनाच्या महागाई भत्त्यातील तफावत दूर करण्यासाठी नेमलेल्या समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या कर्मचा-यांप्रमाणे राज्य शासनाच्या कर्मचा-यांना महागाई भत्ता देण्यात यावा असा कायमस्वरुपी धोरणात्मक निर्णय राज्य शासनाने १९८३ मध्ये घेतला होता, तसाच आजचा निर्णय हा धोरणात्मक आहे की नाही ?" या प्रश्नाला मा.वित्तमंत्र्यांनी उत्तर दिले होते की, "२००१ च्या डिसेंबरमध्ये पुन्हा याबाबतीत राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या संघटनेबरोबर चर्चा करुन पुन्हा हळू हळू सूत्राने केंद्र शासनाच्या महागाई भत्त्यापर्यन्त येण्याचे धोरण स्वीकारले." सभापती महोदया, **आता प्रवास त्याच्या पुढे गेला.** मा.वित्त मंत्र्यांनी खालच्या सभागृहात आणि वित्त राज्यमंत्री महोदयांनी वरच्या सभागृहात या वर्षाचे अंदाजपत्रक सादर केले. २७ मे २००४ च्या भाषणाच्या पुस्तकातील परिच्छेद क्रमांक ९२ मध्ये असे म्हटलेले आहे की, "केंद्राप्रमाणे महागाई भत्ता वाढ द्यावी अशी शासकीय कर्मचा-यांची मागणी आहे. याबाबत माझी शासकीय कर्मचारी संघटनांशी चर्चा झाली आहे. संघटनांनी दिलेल्या सहमतीनुसार माझे शासन सध्या मिळणा-या ५५ टक्के महागाईभत्त्यात ६ टक्के वाढ मंजूर करीत आहे. या प्रयोजनार्थ अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद करण्यात आली आहे." माझा आता

## राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक १ जून २००४ पासून महागाई भत्ता मंजूर करण्याबाबत

### *महाराष्ट्र शासन : वित्त विभाग*

***शासन निर्णय, क्रमांक मभवा ११०३/प्र.क्र. १४/सेवा-९ : मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ : दिनांक १० जून २००४***

पहा :- १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक मभवा ११०२/प्र.क्र.२२/सेवा-९. दिनांक १४ ऑगस्ट २००३.

### शासन निर्णय

राज्य शासकीय कर्मचारी व महागाई भत्ता अनुज्ञेय असणाऱ्या इतर सर्व पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता मंजूर करण्यासंदर्भात शासन असे आदेश देत आहे की,

२. दिनांक **१ जून २००४** पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या **५५ टक्के** च्या ऐवजी **६१ टक्के** दराने महागाई भत्ता वाढ **मंजूर करण्यात यावी.**

३. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भात विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे तशाच यापुढेही लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(शुभदा कारेकर)**
उपसचिव, वित्त विभाग.

*Dearness Relief on pension/family pension*

***GOVERNMENT OF MAHARASHTRA : FINANCE DEPARTMENT***

**Government Resolution : No. DRP-1004/136/SER-4 Mantralaya, Mumbai 400 032, dated 15th June 2004**

**Read :**- Government Resolution, Finance Department, No. DRP 1003/126/SER-4 Dated 14th August 2003

## RESOLUTION

Government is pleased to decide that dearness relief shall be paid to the State Government Pensioners/Family Pensioners on their basic Pension/Family Pension **at the rate of 61%** with effect from 1st June 2004.

2. Payment of dearness relief involving a fraction of a rupee shall be rounded of to the next higher rupee.

3. It will be the responsibility of the Pension Disbursing Authority, i.e.Pay and Accounts Officer, Mumbai/Treasury Officers, as the case may be, to calculate the quantum of dearness relief payable in each individual case.

4. Government is also pleased to direct that above decisions should, **mutatis mutandis,** apply to those employees including family pensioners of Recognised and Aided Educational Institutions, Non Agricultural universities and affiliated Non Government Colleges and Agricultural Universities to whom the pension scheme is made applicable.

5. In exercise of the powers conferred by the proviso to section 248 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962) and of all the other powers enabling it in that behalf, Government is further pleased to decide that the above decision apply to the pensioners including family pensioners of Zilla Parishads.

6. State Government Employees who had drawn lumpsum payment on absorption in a PSU/Autonomous body./Local Bodies and have become entitled to restoration of 1/3rd commuted portion of pension as well as revision of the restored amount in terms of Government Resolution, Finance Department, No. COP 1099/306/SER-4, dated 15th November 1999 will also be entitled to the payment of dearness relief on full pension as per the provisions of Government Resolution Finance Department No. COP-1001/50/SER, dated 9th April 2001, at the prescribed rate and from the date, prescribed in paragraph 1 above.

7. The expenditure on this account should be debited to the Budget Heads to which the retirement benefits of the employees mentioned in the above paras are debited and should be met from the grants sanctioned thereunder.

8. All orders in force in regard to the payment of relief on pension sanctioned by Government from time to time will, **Mutatis Mutandis,** apply to the dearness relief now sanctioned.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**Vasant W. Chaudhari**
Deputy Secretary to Government

एकाच वाक्यात पॉईन्टेड प्रश्न आहे. माझा प्रश्न असा आहे की,या धोरणाप्रमाणे महागाई भत्त्यासाठी पात्र असलेल्या सर्व शासकीय कर्मचा-यांना ,सर्व स्तरावरील शिक्षकांना आणि सर्व निवृत्ती वेतनधारकांना जून २००४ पासून ५५ टक्क्याच्या पुढील ६ टक्के महागाई भत्ता वाढ लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे ही गोष्ट खरी आहे काय?

**श्री.दिलीपराव देशमुखः** सभापती महोदया,शासनाने हा निर्णय घेतला आहे ही गोष्ट खरी आहे.

**श्री.बीटी.देशमुख :** सभापती महोदया,जूनपासून लागू करण्याचा निर्णय घेतला आहे आणि वेतनाची बीले तयार व्हायला या महिन्याच्या १५ तारखेला सुरुवात होणार आहे तेव्हा एक,दोन,तीन दिवसांमध्ये याबाबतचा शासन निर्णय निर्गमित होईल काय?

**श्री.दिलीपराव देशमुख** : सभापती महोदया,आजच हा शासन निर्णय काढला जाईल. आज १०जून २००४ मध्ये या संबंधीचा निर्णय काढला जाईल.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदया, १०जुनला म्हणजे आजच आदेश निर्गमित होतील असे उत्तर मा. मंत्रिमहोदयांनी दिले आहे.मग माझा आणखी एक पुढच्या भागाचा प्रश्न आहे. कर्मचा-यांच्या मूळ वेतनामध्ये महागाई भत्त्यातील पन्नास टक्के महागाई भत्ता समाविष्ट करण्याबाबत अंदाजपत्रक सादर करतांना केलेल्या २७ मे २००४ रोजीच्या मा.मंत्रिमहोदयांच्या भाषणात असे सांगितले होते की, "गेल्या काही दिवसापासून राज्य शासकीय कर्मचा-यांनी मूळ वेतनात पन्नास टक्के महागाई भत्ता समाविष्ट करण्याबाबत मागणी केली आहे.त्याप्रमाणे एकूण महागाई भत्त्याच्या पन्नास टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात समाविष्ट करण्याची ही मागणी मी मान्य करीत आहे..... दुष्काळाची तीव्रता कमी झाल्यावर या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येईल." **आता प्रवास त्याच्याही पुढे गेलेला आहे.** आपण खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला ८ जून २००४ ला सादर केलेले आहे. त्यामध्ये बाब क्रमांक १११आणि ११२ आहे.यातील बाब क्रमांक १११ मधील स्पष्टीकरणात्मक निवेदनातील एक वाक्य मी वाचून दाखवितो. "५०टक्के महागाई भत्ता मूळ वेतनामध्ये विलीन करण्याच्या निर्णयासंबंधात अतिरिक्त तरतूद रुपये ६,६९,४६,००,००० दत्तमत :- राज्य शासनाने कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात पन्नास टक्के महागाई भत्ता विलीन करण्याचा निर्णय घेतला आहे. **हा निर्णय जुलै २००४ पासून कार्यान्वित करावयाचा आहे.**" चालू वर्षातील अपेक्षित खर्च रु ६६९.४६ कोटी एवढा काढण्यात आला आहे.त्यांनतर बाब क्रमांक ११२मध्ये पुन्हा पॉझीटीव्ह स्टेटमेंट आहे. त्यात असे म्हटले आहे की, "पन्नास टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात विलीन करण्याच्या संदर्भात अतिरिक्त तरतुद रुपये २,३६,२४,००,००० दत्तमतः- राज्य शासनाच्या व इतर निवृत्तीवेतनधारकांच्या बाबतीत ५०टक्के महागाई भत्ता वाढ मूळ निवृत्तीवेतनामध्ये विलीन करण्याचे शासनाने ठरविले आहे **हा निर्णय जुलै २००४ पासून कार्यान्वित करावयाचा आहे** आणि याकरिता २३६.२४ कोटीची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे." सभापती महोदया,माझा पॉइन्टेड प्रश्न असा आहे की,जुलै २००४ पासून ५०टक्के रक्कम मूळ वेतनामध्ये विलीन करण्याचा निणय शासनाने घेतला आहे ही गोष्ट खरी आहे काय?

**श्री.दिलीपराव देशमुख** : होय,सभापती महोदया.

**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदया,मग असा निर्णय जर आपण घेतला आहे तर आठ,दहा,पंधरा दिवसामध्ये त्यासंबंधीचे शासननिर्णय निर्गमित केले जातील काय?

**श्री.दिलीपराव देशमुख** : सभापती महोदया,पंधरा दिवसात निर्णय निर्गमित केला जाईल.

******

## SPEECH OF Shri JAYANT PATIL
### Finance Minister
**On the Additional Budget Estimates, 2004-05 of the Government of Maharashtra in the Legislative Assembly on Thursday, the 27th May 2004**

### PART-I

**Dearness allowance to the State Government employees.**

**92.** Government employees have always extended unstinted co-operation to our Government during the last four and half years. They have also contributed one day's salary as a help for the scarcity conditions prevailing in the State. They have made a demand that the dearness allowance payable to them be brought at par with that now being paid to the Central Government employees. As agreed to by the employees Unions and Associations, my Government has decided to increase the dearness allowance by another 6 per cent over and above the prevailing rate of 55 per cent. Adequate provision has been made for the purpose.

**92.1** Since last few days, the State Government employees have been demanding 50 per cent of the dearness allowances be merged with basic pay. I accept the demand. At the same time, it is the responsibility of the Government to provide succour to the rural population and tackle the drought. Keeping these factors in view, the decision will be implemented after the severity of the drought is lessenned.

## महाराष्ट्र शासनाचा २००४-०५ या वर्षाचा अतिरिक्त अर्थसंकल्प विधानसभेला सादर करतांना वित्त मंत्री श्री. जयंत पाटील यांनी गुरुवार, दिनांक २७ मे २००४ रोजी केलेले भाषण

### भाग पहिला

**राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता वाढ**

९२. लोकशाही आघाडी शासनास गेल्या साडेचार वर्षात राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी नेहमीच सहकार्य केले आहे. राज्यातील दुष्काळी परिस्थितीसाठी देखील राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचे वेतन दिले आहे. केंद्राप्रमाणे महागाई भत्ता वाढ द्यावी अशी शासकीय कर्मचाऱ्यांची मागणी आहे. याबाबत माझी शासकीय कर्मचारी संघटनांशी चर्चा झाली आहे. संघटनांनी दिलेल्या सहमतीनुसार माझे शासन सध्या मिळणाऱ्या ५५ टक्के महागाई भत्त्यात ६ टक्के वाढ मंजूर करीत आहे. या प्रयोजनार्थ अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद करण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसापासून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी मूळ वेतनात ५० टक्के महागाई भत्ता समावेश करण्याबाबतची मागणी केली आहे. त्याप्रमाणे एकूण महागाई भत्त्यापैकी ५० टक्के महागाई भत्ता हा मूळ वेतनात समाविष्ट करण्याची ही मागणी मी मान्य करीत आहे. अर्थात राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करणे व ग्रामीण जनतेस दिलासा देणे ही आमची जबाबदारी आहे, हे लक्षात घेता दुष्काळाची तीव्रता कमी झाल्यावर या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येईल.

## MAHARASHTRA STATE GOVT. EMPLOYEES CONFEDERATION
**M-6, Mantralaya, Mumbai - 400 032** : Date : May 27, 2004

### Additional DA and Merger of DA

Nearly 2 million govt., zila parishad, semi govt. employees and teachers in Maharashtra will get from 01.06.2004 additional 6% Central DA. Further 50% of their total DA will be merged in basic pay from July 2004. Arrears of DA and its merger with pay were foregone in view of grave famine and drought in the state. These two demands were settled after negotiations with state finance minister who included them in his budget speech delivered today, the 27th May.

Salaries and allowances of employees and teachers will go up by 17% per month as a result of this settlement.State Govt. pensioners will also get proportionate benefits in their monthly pension. The central govt. Scheme of Assured Career Progression(ACP) is expected to be accepted by the state govt. when further negotiation take place in June. Though this is a victory of United movement of employees and teachers it could be achieved without strife in view of assembly elections in September 2004.

Ashok Thool,General Secretary — G.S. Shete, Chairman — Yogiraj Khonde, President

# ५० टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात समाविष्ट करण्याचे आदेश १५ दिवसांत निर्गमित करण्यात येतील असे आश्वासन दिनांक १०.६.२००४ रोजी शासनातर्फे देण्यात आले आहे. -वित्तमंत्री

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन, २००४*
*शुक्रवार, दिनांक ११ जून २००४*

**व्ही.यू. डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, वसंतराव खोटरे, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, जी.एल.अैनापुरे यांनी महाराष्ट्र विधान परिषद नियम १०१ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे.**

"राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना व महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ यांच्या नेतृत्वाखाली शासकीय कर्मचाऱ्यांनी १ जुलै, २००३ पासूनचा ४ टक्के व १ जानेवारी २००४ पासूनचा २ टक्के, एकूण ६ टक्के वाढीव महागाई भत्ता मिळावा यासाठी दिलेले निवेदन, केंद्र शासनाच्या दराने महागाई भत्ता सुरु करण्याचे शासनाने मान्य करुन सुद्धा त्याची अंमलबजावणी न होणे, ११ डिसेंबर, २००३ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक ३७२३१ च्या उत्तरात दिनांक १ जुलै, २००३ पासून ४ टक्के भत्त्याचा प्रश्न विचाराधीन आहे असे उत्तर देणे, ५० टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात समाविष्ट करावा अशी राज्य सरकारी अधिकारी - कर्मचारी महासंघाने दिनांक २०-२१ मे, २००४ रोजी अर्थमंत्र्यांकडे चर्चा करुन मागणी करणे, महागाई भत्त्याची समानता व अन्य प्रलंबीत मागण्यांबाबत शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया"

**मा. श्री.जयंत पाटील, वित्तमंत्री यांचे निवेदन**

राज्याचे सीमित आर्थिक स्त्रोत व साधनसंम्पत्ती विचारात घेऊन महागाई भत्ता व तदर्थ बोनसबाबत लागू असलेल्या केंद्र शासनाच्या विद्यमान सुत्रास पर्यायी सूत्र सुचविण्यासाठी मंत्रिमंडळ समितीची नियुक्ती करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने, दिनांक २१ डिसेंबर २००१ रोजी राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी संघटनांशी चर्चा करुन दिनांक १ एप्रिल २००२ पासून राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या महागाई भत्त्याच्या वाढी केंद्र शासनाच्या सुत्रानुसार दिनांक १.४.२००३ पासून अनुज्ञेय करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु महागाई भत्त्याच्या वाढीमुळे राज्य शासनावर पडणारा आर्थिक भार प्रचंड असल्याने उपरोक्त वाढ शासन देऊ शकले नव्हते व त्यामुळे केंद्र व राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या महागाई भत्त्यात १०.५ टक्के तफावत होती. तथापि, दिनांक १४ ऑगस्ट २००३ च्या शासन निर्णयान्वये केंद्र शासनाप्रमाणे ५५ टक्के महागाई भत्ता थकबाकीसह दिनांक १६ ऑक्टोबर २००३ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आला.

तद्नंतर केंद्र शासनातर्फे दिनांक १.७.२००३ पासून ४ टक्के व दिनांक १.१.२००४ पासून २ टक्के महागाई भत्त्यामध्ये वाढ करण्यात आली. तसेच दिनांक १.४.२००४ पासून ५० टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात समाविष्ट करण्यात आला. या अनुषंगाने राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना व इतर संघटनांची शासनाकडे निवेदने प्राप्त झाली होती. सदरहू प्रकरण शासनाच्या विचाराधीन असल्याने तारांकित प्रश्न क्रमांक ३७२३१ च्या उत्तरात दिनांक १.७.२००३ पासून ४ टक्के भत्त्याचा प्रश्न विचाराधिन असल्याबाबत उत्तर देण्यात आले होते.

उपरोक्त निवेदनाचा विचार करण्यात येऊन महाराष्ट्र राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटना व राजपत्रित अधिकारी कर्मचारी संघटना यांच्याबरोबर चर्चा करण्यात येऊन दिनांक २७.५.२००४ रोजी महाराष्ट्र शासनाचा सन २००४-२००५ या वर्षाचा अतिरिक्त अर्थसंकल्प विधानसभेत सादर करतांना शासनाने सध्या मिळणाऱ्या ५५ टक्के महागाई भत्त्यात ६ टक्के वाढ व मुळ वेतनात ५० टक्के महागाई भत्ता समाविष्ट करण्याबाबतची कर्मचारी संघटनांची मागणी मान्य केली. त्यानुसार ६ टक्के महागाई भत्ता वाढ देण्याचे आदेश दिनांक १० जून २००४ रोजी पारीत करण्यात आले. **५० टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात समाविष्ट करण्याचे आदेश १५ दिवसांत निर्गमित करण्यात येतील असे आश्वासन दिनांक १०.६.२००४ रोजी शासनातर्फे देण्यात आले आहे. त्यामुळे याबाबत शासनाचे दुर्लक्ष होत आहे हे म्हणणे संयुक्तिक नाही.**

अन्य प्रलंबित मागण्यांबाबत शासनातर्फे वेगळ्याने विचार करण्यात येत आहे.

******

### "निवृत्तिवेतनधारकांना महागाई वाढ देणे"

उपरोक्त विषयावरील पूर्वीचे शासन निर्णय

(1) No. DRP-1099/130/SER-4, dated 29th July 1999. : P. 126 of 1999 NUTA Bulletin
(2) No. DRP-1099/305/SER-4 dated 15th November, 1999. : P. 161 of 1999 NUTA Bulletin
(3) No. PEN-1099/307/SER-4, dated 16th November, 1999 : P. 166 of 1999 NUTA Bulletin .
(४) क्रमांक निमवा १००२/२६१/सेवा-४, दिनांक २३ ऑगस्ट २००० : P. 39 of 2002 NUTA Bulletin
(५) क्रमांक निमवा १००२/२८१/सेवा-४, दिनांक : १३ ऑक्टोबर २००१ : P. 40 of 2002 NUTA Bulletin
(६) क्रमांक : सेनिवे-१००२/१/सेवा-४, दिनांक : १३ जानेवारी २००२ : P. 39 of 2002 NUTA Bulletin
(७) क्रमांक निमवा १००२/१३६/सेवा-४ दिनांक : १८ मे, २००२ : P. 41 of 2002 NUTA Bulletin
(8) No. DRP-1003/126/SER-4, dated 14th August 2003 : P. 80 of 2003 NUTA Bulletin
(9) No. DRP-1004/136/SER-4 dated 15th June, 2004. : P.77 of 2004 NUTA Bulletin

### राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता वाढ देणेबाबत

उपरोक्त विषयावरील पूर्वीचे शासन निर्णय

(१) क्रमांक मभवा ११८८/२१/सेवा-१०. दिनांक ३ मार्च १९८८. : P. 57 of 1988 NUTA Bulletin
(२) क्रमांक मभवा-११९८/प्र. क्र. १४/९८ सेवा-१०, दिनांक १४ डिसेंबर, १९९८ : P. 131 of 1999 NUTA Bulletin
(३) क्रमांक मभवा११९९/१६/सेवा-१०, दिनांक : ७ सप्टेंबर, १९९९ : P. 151 of 1999 NUTA Bulletin
(४) क्रमांक : मभवा ११९९/२३/सेवा-१०, दिनांक : ५ नोव्हेंबर १९९९ : P. 154 of 1999 NUTA Bulletin
(५) क्रमांक मभवा ११००/१५/२०००/सेवा-१०, दिनांक २२ ऑगस्ट, २००० : P. 36 of 2002 NUTA Bulletin
(६) क्रमांक मभवा ११००/प्र.क्र.३३/सेवा-९, दिनांक : १२ ऑक्टोबर २००१ : P. 37 of 2002 NUTA Bulletin
(७) क्रमांक मभवा ११०२/प्र.क्र.६/सेवा-९, दिनांक : १५ मे, २००२ : P. 37 of 2002 NUTA Bulletin
(८) क्रमांक मभवा ११००/प्र.क्र.३३/सेवा-९, दिनांक : ११ जानेवारी, २००२ : P. 38 of 2002 NUTA Bulletin
(९) क्रमांक मभवा ११०२/प्र.क्र.२२/सेवा-९, दिनांक : १४ ऑगस्ट, २००३ : P. 78 of 2003 NUTA Bulletin
(१०) क्रमांक मभवा ११०३/प्र.क्र.१४/सेवा-९, दिनांक : १० जून, २००४ : P.77 of 2004 NUTA Bulletin

# कृषी विद्यापीठामधील शिक्षकांना यु.जी.सी. वेतनश्रेणी लागू करताना भेदभावपूर्ण वागणूक देणे

*सन १९९० चे दुसरे अधिवेशन : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही,*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड ८९, क्रमांक ६, पृष्ठ ६*
**शुक्रवार, दिनांक ३० मार्च १९९०**

* ५८१. **सर्वश्री पु.ब.सोमवंशी, बी.टी.देशमुख, दिवाकर जोशी, ना.स.फरांदे, नितीन गडकरीः** तारांकित प्रश्न क्रमांक २४९८६ ला दिनांक २१ जुलै १९८९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय कृषि मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील कायः-

(१) विद्यापीठ अनुदान आयोगाची नवीन वेतनश्रेणी लागू करताना सेवानिवृत्तीचे वय, थकित रक्कम देण्याची पद्धती, संशोधन पदवीधारकांना उत्तेजन इत्यादी बाबतीत भेदभावपूर्ण वागणूक कृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न महाविद्यालये यातून काम करणारे शिक्षक यांना देण्यात येत आहे, अशी तक्रार करणाऱ्या २५ एप्रिल १९८९ च्या विचाराधीन निवेदनावर शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय;

(२) असल्यास, उक्त निवेदनातील तक्रारीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे काय कारवाई करण्यात आली वा येत आहे?

**श्री. शिवाजीराव देशमुखः** (१) होय.

(२) या निवेदनातील सर्व त्रुटी दूर करण्यात आलेल्या आहेत. तथापि, सेवानिवृत्तीच्या वयाबाबत असा खुलासा करण्यात येतो की, पारंपारिक विद्यापीठातील **शासकीय महाविद्यालयातील शिक्षकांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षे असे विहित केले आहे. तशाच प्रकारे कृषी विद्यापीठातील शिक्षकांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षे इतके विहित करण्यात आले आहे.**

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, या प्रश्नाच्या संदर्भात उत्तर देताना 'सर्व त्रूटी दूर करण्यात आलेल्या आहेत' असे उत्तरात म्हटले आहे. तर ज्या त्रुटी दूर करण्यात आल्या आहेत त्या बाबतीतील शासकीय निर्णय निर्गमित झाले असतील असे मी मानतो, पण प्रत्यक्षात खरोखर हे त्रुटी दूर करणारे शासकीय निर्णय निर्गमित झाले आहेत काय?

**श्री. शिवाजीराव देशमुखः** अध्यक्ष महाराज, या निवदेनातून ६ त्रुटी दूर करण्यात आल्या आहेत त्यापैकी ५ त्रुटी अशा आहेत की, संशोधन पदवीधरांना उत्तेजन देणे या संबंधातील आदेश ५ जानेवारी १९९० ला निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानंतर थकबाकी देण्याबाबतच्या शासकीय निर्णयाचे आदेश ५ जानेवारी १९९० लाच काढण्यात आले आहेत. तसेच प्रपाठक म्हणजे रिडर यांच्याबाबतीतील निर्णयाचे आदेश १७ मार्च १९८९ ला काढण्यात आलेले आहेत. तर ग्रंथपाल किंवा शारीरिक शिक्षक यांच्या सुधारित वेतन देण्याबाबतचे आदेश ३ जून १९८९ ला काढण्यात आलेले आहेत. मागणी क्रमांक ३ जी आहे त्यात सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करावे असे म्हटले आहे. **पण या बाबतीत कृषी विद्यापीठ, खाजगी महाविद्यालये, शासकीय महाविद्यालये यांच्या कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षे केलेले आहे.**

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, यामध्ये हे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षे ठेवलेले आहे आणि त्याचे कारण यामध्ये असे दिलेले आहे की, इतर म्हणजे जी पारंपारिक विद्यापीठे आहेत त्यातील, शासकीय महाविद्यालयातील शिक्षकांच्या सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्ष आहे म्हणून यांच्यासाठीसुद्धा तेच ठेवलेले आहे. अध्यक्ष महाराज, या संदर्भात या सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. केंद्र सरकारने आणि युजीसीने हे वय सर्व प्राध्यापकांच्या बाबतीत युनिफॉर्म ६० वर्षे असावे असे ठरविले आहे. २२ जुलै १९८८ चे जे भारत सरकारचे या संदर्भातील पत्र आहे ते मंत्रिमहोदयांना देण्यात आलेल्या निवेदनासोबत जोडलेले आहे. अध्यक्ष महाराज, प्राध्यापकांशी चर्चा करुन या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वतः लक्ष घालून ४ दिवस हे प्रश्न हाताळले आणि असे ठरवून दिले की, या अटींची भारत सरकारचे जसे आहे तसेच आपणही अंमलबजावणी करु मात्र ४५०० ते ७३०० च्या स्केलची बाब सोडून. अध्यक्ष महाराज, या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी जे सांगितले ते असे होते की, 'The Govt. of India's suggestion on revision of pay-scale dated 22nd July 1988 be implemented by the State Government as a composite scheme with effect from 1st January 1986 except that in respect of scale of 4500-7300, the matter will be further considered by the Government.' त्याचप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांनी असेही सांगितले की, या बाबतचे आदेश आम्ही २८ फेब्रुवारी १९८९ पर्यंत काढू. अध्यक्ष महाराज, हे आदेश त्याप्रमाणे २७ फेब्रुवारी १९८९ ला निघाले आहेत. त्या आदेशाप्रमाणे सर्वांचेच वय ६० ठेवण्यात आलेले आहे. फक्त एक अट खाली ठेवलेली आहे की, सरकारी महाविद्यालयातील लोकांचे वय हे ५८ वर्षे राहील. आता अध्यक्ष महाराज, हायकोर्टाने त्यांच्या बाजूने निर्णय दिलेला आहे की, हे असे करणे चूक आहे, असे कोर्टाने म्हटले तर भारत सरकारच्या नियमाप्रमाणे झाले पाहिजे. **देशातील सर्व कृषि विद्यापीठांमध्ये हे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षेच आहे. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्येसुद्धा हे वय ६० वर्षेच आहे.** तेव्हा माझे म्हणणे असे आहे की, ही चूक शासकीय महाविद्यालयाबाबत आपल्याकडून झालेली असल्यामुळे येथे ही चूक पुन्हा होऊ नये, ती आपण सुधारली पाहिजे. अध्यक्ष महाराज, माननीय मुख्यमंत्री आज आता येथे स्वतः उपस्थित आहेत तेव्हा मी त्यांनाच विचारतो की, शासकीय महाविद्यालयाबाबत आणि या बाबतीत सेवानिवृत्ती वयाच्या संदर्भात हे जे दोष राहिले आहेत ते दूर करण्यात येतील काय?

**श्री. शिवाजीराव देशमुखः** अध्यक्ष महाराज, सेवानिवृत्तीच्या वयाच्या बाबतीत जी मागणी आहे त्या बाबतीत कृषी विद्यापीठातील जे शिक्षक आहेत त्यांना महाराष्ट्र नागरी सेवांचे नियम लागू आहेत आणि त्या नियमानुसार त्यांना सारे फायदेही देण्यात येतात तेव्हा या दृष्टीने विचार केल्यास ज्यावेळी बीसीएसआरचे नियम लागू होतात वा लागू करण्यात आलेले आहेत त्यावेळी **शासकीय कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वय ५८ वर्षे आहे तर मग त्यानुसारच या कृषी विद्यापीठातील खाजगी महाविद्यालये असतील वा शासकीय महाविद्यालये असतील त्या ठिकाणच्या कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय ५८ वर्षेच करावे असा निर्णय झालेला आहे.** अध्यक्ष महाराज, या बाबतीत कृषी विभागाने योग्य ती छाननी केलेली आहे आणि वित्त विभागाचेही काही आक्षेप आहेत. तेव्हा या दृष्टीने प्रयत्न करीत असता याचा अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना येथे व्यक्त केल्या आहेत त्या दृष्टीने पुन्हा या बाबतीत तपासणी करण्यात येईल आणि ही तपासणी पूर्ण झाल्यानंतरच यावर अंतिम निर्णय घेणे शक्य होईल.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, माननीय मंत्रिमहोदय बीसीएसआरमधील जो नियम सांगताहेत तो हायकोर्टाने स्क्वॅश केलेला आहे, रद्दबदल ठरविला आहे. हायकोर्टाने या बाबतीत स्पष्ट म्हटले आहे की, नियमाचा हा भाग आहे, तो स्क्वॅश झालेला आहे. आपण नंतर असे म्हटले आहे की, शासनाला सुप्रीम कोर्टात जायचे आहे आणि तसे सभागृहातही वारंवार सांगितले की, हायकोर्टाचा निर्णय असताना सुप्रीम कोर्टात जायचे म्हटले असते तर आम्ही इतर वेळी काही म्हटले नसते पण....

**सभापती** : या बाबतीत वेगळा प्रश्न असा आहे की, शासकीय महाविद्यालयातील शिक्षकांचे सेवानिवृत्तीचे वय आणि त्याच्याच बरोबर जे कृषी विद्यापीठातील शिक्षक आहेत त्यांचेही सेवा- निवृत्तीचे वय असेच आहे. तेव्हा त्यांनी आजच्या घटकेला काय केले आहे तर शासकीय महाविद्यालयातील शिक्षकांचे सेवानिवृत्तीचे वय जे आहे तेच यांनाही दिलेले आहे. परंतु आपण म्हणता त्याप्रमाणे जर हे वय ६० वर्षे असेल किंवा ६० वर्षे वय करावे असे हायकोर्टाने सुचविले असेल आणि केंद्र सरकारनेही सुचविले असेल तर त्याचा विचार स्वतंत्रपणे होईल.

**श्री.बी.टी.देशमुखः** अध्यक्ष महाराज, माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या वेळेस झालेल्या चर्चेमध्ये ही गोष्ट मान्य केलेली आहे आणि म्हणून आमचे म्हणणे असे होते की, हायकोर्टाने बीसीएसआरचा जो भाग स्क्वॅश केलेला आहे. तेव्हा यात अपील करणेसुद्धा बरोबर नाही. अध्यक्ष महाराज, मी आपल्याला सांगू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर झालेल्या चर्चेमध्ये जे काही ठरले होते आणि त्यांनी मान्य केले होते त्यानुसार २७ फेब्रुवारी १९८९ चे आदेश निघाले फक्त त्यात एक ओळ अशी आहे की, शासकीय कॉलेजच्या लोकांना अपवाद केलेला आहे. त्या आधारावर हे जे अपवाद केले जात आहेत हेही बरोबर नाही. साऱ्या देशांपेक्षा वेगळी स्थिती येथे निर्माण करणे हे उचित होणार नाही. म्हणून मुख्य मंत्र्यांबरोबर चर्चेमध्ये ठरल्यानुसार

आदेश निघून त्याची अंमलबजावणी होईल काय? अन्यथा यामध्ये असे होत आहे की, एक एक माणसाला हायकोर्टामध्ये जाऊन स्टे आणायला आपण सांगत आहात. अनेकांनी हायकोर्टातून स्टे आणले आहेत आणि जे दोन प्रेमाचे लोक आहेत त्यांनी सरळ मंत्रालयातून स्टे नेले आहेत. माझ्याजवळ त्यांच्या प्रती आहेत. मी आपल्याला ते दाखवू शकेन. म्हणजे जी माणसे ५८ वर्षामुळे रिटायरमेंटला आली आहेत त्यांनी दोन महिने अगोदर हायकोर्टात जायचे आणि ४-५ हजार रुपये स्टे आणण्यात खर्च करायचे अशा ११ केसेसची माहिती माझ्याकडे आहे म्हणून **ही जी भेदभावपूर्ण वागणूक आहे ती संपुष्टात यावी यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चेत ठरल्यानुसार या लोकांचे निवृत्तीचे वय ६० वर्षे केल्याचा आदेश काढून त्याची अंमलबजावणी होईल काय?**

**श्री.शिवाजीराव देशमुख :** अध्यक्ष महाराज, या बाबतीत पुन्हा एकवार छाननी करुन आम्ही तपासणी करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नाच्या माध्यमातून सविस्तर विवेचन येथे केलेले आहे. तेव्हा या बाबतीत हायकोर्टाचे म्हणणे काय आहे, त्यांचा निर्णय काय आहे हेही पहावे लागेल आणि यापूर्वीचे शासनाचे जे निकष आहेत, किंबहुना वित्त विभागाशीसुद्धा सल्लामसलत करुन नंतरच याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. तेव्हा या सर्वच दृष्टीने मी तपासणी करतो असे सांगितले आहे. त्यानंतरच यावर अंतिम निर्णय घेण्याची कार्यवाही होईल. आज ही त्रुटी अद्याप दूर करता आलेली नाही इतकेच मला सांगायचे आहे.

**श्री.नारायण वैद्य :** अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी माननीय मुख्यमंत्र्यांच्या संदर्भात येथे काही विधान केले की, त्यांच्या चर्चेमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी सहभाग घेतला होता. तसेच या प्रश्नाच्या बाबतीत खुलासा करण्याचे आवाहनही त्यांनी मुख्यमंत्र्यांना केले. तेव्हा माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, या विषयीचा खुलासा स्वतः मुख्यमंत्र्यांनी करावा.

**सभापती :** हा हरकतीचा मुद्दा होत नाही. कारण आपला नियम असा आहे की, सदस्यांनी प्रश्न विचारला म्हणजे मंत्र्यांनी उत्तर दिलेच पाहिजे असे नाही. तेव्हा मंत्र्यांना जर उत्तर द्यायचे असेल तर ते देतील अन्यथा नाही.

**श्री.नारायण वैद्यः** अध्यक्ष महाराज, या पलिकडे जाऊनही मी आपल्याला काही सांगितले तर हरकत नसावी. स्वतः माननीय मुख्यमंत्री हे सन्माननीय सदस्यांच्या आवाहनानंतर उत्तर देण्याच्या बेतात होते.

**सभापती :** तो तुम्हाला भास झाला असेल.

**श्री.बी.टी.देशमुखः**अध्यक्ष महाराज, २५ एप्रिल १९८९ चे निवेदन मा. मंत्र्यांना मिळाले आहे काय? या पहिल्या प्रश्नाला त्यांनी 'होय' असे उत्तर दिले आहे आणि त्या निवेदनासोबतच भारत सरकारचे आदेशसुद्धा जोडलेले आहेत. शिवाय महाराष्ट्र सरकारचेही आदेश जोडलेले आहेत आणि मुख्यमंत्र्यांबरोबर झालेले चर्चेचे कार्यवृत्त सुद्धा सोबत जोडलेले आहे. तेव्हा माझे म्हणणे एकच आहे की....

**सभापती :** ते तपासून घेतील, तसे त्यांनी सांगितले आहे.

**श्री.बी.टी.देशमुखः** अध्यक्ष महाराज, आम्ही ४५ दिवस अगोदर प्रश्न देत असतो तेव्हा त्यांना हे सारे तपासून घेण्यासाठी भरपूर वेळ मिळालेला आहे....

**सभापती :** आता कृषि मंत्री नवे आले आहेत, म्हणूनच ते सारे तपासून घ्यावे लागेल असे ते म्हणतात.

**श्री.बी.टी.देशमुखः** अध्यक्ष महाराज, तर मग माननीय मुख्यमंत्र्यांना मी अशी विनंती करतो की, त्यांनी या बाबतीत....

**सभापती :** तेही या बाबतीत पुन्हा पाहून घेतील.

**श्री. दिवाकर जोशी :** अध्यक्ष महाराज, येथे याविषयी मंत्र्यांनी सांगितले की, कोर्टाचे जे निर्णय झालेले आहेत ते काय आहेत ते तपासून घेऊ. याच संदर्भात कोर्टात ११ केसेस आहेत आणि त्या सर्व केसेसमध्ये सरकारला

## कंत्राटी नेमणूका देतांना शासकीय महाविद्यालयातील प्राध्यापकांना भेदभावपूर्ण वागणूक

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन, २००४*
*बुधवार, दिनांक २६ मे २००४*

**(७) * ४१७७८ डॉ. एन.पी.हिराणी, प्रा.बी.टी.देशमुख, श्री. मखराम पवार, श्री. व्हि.यू.डायगव्हाणे, श्री.वसंतराव खोटरे, श्री. प.म.पाटील, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री. जी. एल. अैनापूरे :** सन्माननीय उच्च शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील कायः-

(१) महाविद्यालयीन प्राध्यापकांना कंत्राटी पध्दतीने नेमणूका देतांना ना हरकत प्रमाणपत्राच्या माध्यमातून शासननिर्णयात नसलेली "फक्त एका शैक्षणिक वर्षाकरिता नेमणूक देण्याची अट" उच्च शिक्षण संचालनालयाने त्यांच्यावर लादली ही बाब लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ मार्च २००४ च्या पत्रान्वये मा.उच्च शिक्षण संचालक यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर ती अट रद्द करण्यात आली हे खरे आहे काय ;

(२) खरे असल्यास अशासकीय महाविद्यालयातील शेकडो प्राध्यापकांच्या बाबतीत ती अट रद्द करण्यात आलेली असली तरी शासकीय महाविद्यालयातून काम करणाऱ्या शेकडो प्राध्यापकांच्या बाबतीत मात्र हा अन्याय दुर न करण्याने त्यांना भेदभावपूर्ण वागणूक देण्यात आलेली आहे अशी तक्रार करणारे एक निवेदन शासकीय महाविद्यालयातील अनेक शिक्षकांनी दिनांक १५ एप्रिल,२००४ रोजी किंवा त्या दरम्यान संचालक उच्च शिक्षण यांना, संचालक, विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती, यांच्या मार्फत सादर केले हेही खरे आहे काय ;

(३) खरे असल्यास या तक्रारीच्या निवारणार्थ काय उपाययोजना करण्यात आलेली आहे ;

(४) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयदत्त क्षीरसागर** : (१) होय.

(२) होय.

(३) शासकीय महाविद्यालयातील अधिव्याख्याता ही पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत येतात. त्यामुळे शासकीय महाविद्यालयातील अधिव्याख्याता या पदावर एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने सलग नियुक्ती देता येणार नाही. तथापि, **अशा सर्व अधिव्याख्यातांना गतवर्षी पुनश्च नियुक्त्या देऊन त्यांच्या सेवा पुढील वर्षासाठी चालू ठेवण्यात आलेल्या होत्या.**

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

*****

***टिप :-** तारांकित प्रश्न क्रमांक ४१७७८ हा ७ व्या क्रमांकावर असल्यामुळे चर्चेसाठी येवू शकला नाही. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी प्रा.बी.टी.देशमुख यांना असे सांगितले की, "शासकिय महाविद्यालयातील कंत्राटी पद्धतीवर काम करणाऱ्या अधिव्याख्यात्यांना एक वर्षा ऐवजी २ वर्षासाठी नियुक्ती देण्यात यावी अशा सूचना आज देण्यात आल्या आहेत."*

## महाविद्यालयीन व विद्यापीठ पातळीवरील रिक्त पदे नियमित पध्दतीने भरण्याची कार्यवाही

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन, २००४*
*बुधवार, दिनांक ९ जून २००४*

**(११) * ४२२६८ प्रा. बी. टी. देशमुख, श्री.व्हि.यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. प.म. पाटील , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे** : तारांकित प्रश्न क्रमांक ३७२१० ला दिनांक १७ डिसेंबर, २००३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाविद्यालयीन व विद्यापीठीय पातळीवरील रिक्त पदे तसेच उच्च शिक्षण विभागाअंतर्गत येणारी शिक्षकीय पदे नियमित पध्दतीने न भरता दिनांक २९ जुलै, २००३ च्या आणि दिनांक २५ जुलै, २००२ च्या शासन निर्णयानुसार भरल्याने अनेक बेकायदेशीर व नियमबाह्य बाबींना तोंड द्यावे लागेल या बाबी काही विद्यापीठांनी शासनाच्या लक्षात आणून दिल्या हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, याबाबत नियमित पदे भरण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केलेली आहे ;

(३) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयदत्त क्षीरसागर** : (१) व (२) वित्त विभागाच्या दिनांक १०/९/२००१ च्या शासननिर्णयान्वये पदांचा आढावा पूर्ण झाल्याशिवाय रिक्त पदे भरता येत नाहीत. सर्व खात्यातील पदांचा आढावा वित्त विभागाच्या मान्यतेनंतर संयुक्त समिती व उच्च स्तर समितीच्या मान्यतेसाठी सादर करावा लागतो. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून ठोक वेतनावर २/३ शिक्षकीय पदे भरण्यास शासनाने दिनांक २५/७/२००२ व १९/७/२००३ च्या शासननिर्णयान्वये मंजुरी दिली होती त्यावर काही विद्यापीठांनी आक्षेप नोंदविले होते. तथापि शासनाने विद्यार्थीहित विचारात घेऊन तात्पुरती व्यवस्था म्हणून वरीलप्रमाणे धोरण स्वीकारले आहे. सदर शासननिर्णयात निवडीची कार्यपद्धती ठरवून दिली होती. तसेच आवश्यक अटी व शर्ती देखील घातलेल्या आहेत. वरील पदांचा आढावा समित्यांपुढे लवकर घेण्याबाबत वित्त विभागास विनंती करण्यात आली आहे. पदांच्या आढाव्यास मंजूरी मिळाल्यावर नियमितपणे पदे भरता येतील.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

विशेषतः मंत्र्यांना पार्टी केलेले आहे असे असताना स्टे दिल्यानंतरही .... असे असतानाही आता आपण स्टे उठविण्याची प्रक्रिया सुरु करणार आहात काय? या ठिकाणी विनाकारण विलंब लावला जात आहे. अध्यक्ष महाराज, या बाबतीत यापूर्वीच निर्णय झाले आहेत.

**सभापती :** मा. कृषी मंत्री नवीन आहेत, त्यांना ही बाब तपासण्यासाठी वेळ दिला पाहिजे.

**श्री. दिवाकर जोशी :** अध्यक्ष महाराज, याबाबतचा निर्णय निश्चित कालावधीत म्हणजे पुढील सेशनपूर्वी होईल काय?

....(अडथळा)....

या बाबतचा निर्णय लवकरात लवकर घेण्यात येईल काय?

**श्री. शिवाजीराव देशमुखः** खरे तर हा प्रश्न न्याय प्रविष्ट आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. या ठिकाणी चार वेगवेगळे दावे आहेत. आणि त्याला स्थगिती दिली आहे. मला या ठिकाणी एवढे सांगावयाचे आहे की, या बाबतीत या ठिकाणी आता चर्चा झाली आहे, त्यावरुन मी ही बाब संपूर्णपणे तपासून पाहीन. यापूर्वीच शासनाने या बाबतीत कोणते निर्णय घेतले आहेत, याची शहानिशा करुन या बाबतीत निर्णय घेण्याच्या बाबतीत मी स्वतः लक्ष घालीन.

**श्री.बी.टी.देशमुखः** अध्यक्ष महाराज, ही बाब न्यायप्रविष्ठ आहे असे म्हणणे बरोबर होणार नाही. या बाबतीत हायकोर्टाचा निर्णय झाला आहे. १० ते ११ प्रकरणात शासनाने आदेश न काढल्यामुळे वैयक्तिकरीत्या ५८ व्या वर्षी निवृत्त करण्याला स्टे देण्यात आलेला आहे. न्यायप्रविष्ट आहे असे म्हणणे बरोबर नाही. अध्यक्ष महाराज, माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर या बाबतीत जी चर्चा झाली होती त्यामध्ये जे सांगितले आहे ते महत्वाचे आहे. म्हणून या ठिकाणी ही बाब न्यायप्रविष्ट आहे असे म्हणणे गैरलागू आहे. अध्यक्ष महाराज, जी चर्चा झाली होती त्यामध्ये स्पष्टपणाने असे ठरले आहे की, या अटी सर्वत्र सारख्या राहतील. तेव्हा या बाबतीत तशी अंमलबजावणी होईल काय?

**श्री. शिवाजीराव देशमुखः** अध्यक्ष महाराज, नागपूरच्या उच्च न्यायालयात चार दावे दाखल झाले होते. ही वस्तुस्थिती आहे. यातील ३ प्रकरणांच्या बाबतीत स्टे मिळाला आहे. या ठिकाणी माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत, त्या दृष्टीकोनातून मी सर्व बाबी तपासून पाहीन. या बाबतचे अभिप्राय लक्षात घेऊन या बाबतचा निर्णय घेण्यात येईल. परंतु या ठिकाणी काही विलंब लागेल.

**श्री.बी.टी.देशमुखः** मा. मुख्यमंत्र्यांबरोबर या बाबतीत जी चर्चा झाली आहे, त्याचे कार्यवृत्त लेखी स्वरुपाचे आहे....

**सभापती :** या सर्व पार्श्वभूमीवर माननीय मंत्रिमहोदयांना ही बाब पुन्हा एकदा तपासण्याची गरज वाटली तर त्यात गैर काय आहे? माननीय मंत्रिमहोदय या बाबीची तपासणी करणार आहेत.

**श्री.बी.टी.देशमुखः** अध्यक्ष महाराज, या ठिकाणी महत्वाचा मुद्दा असा आहे की, ही गोष्ट बरोबर नाही.

**सभापती :** माननीय मंत्रिमहोदय या बाबतीत स्वतः लक्ष घालून निर्णय घेणार आहेत.

**श्री.ना.स.फरांदे :** अध्यक्ष महाराज, माननीय मंत्रिमहोदयांनी सुरुवातीला असे सांगितले आहे की, या गोष्टीला वेळ लागेल, आणि आता नंतर सांगत आहेत की, विलंब लागणार आहे....

**श्री. शिवाजीराव देशमुखः** माझ्या दृष्टीने यामध्ये काहीच फरक नाही.

**श्री.बी.टी.देशमुखः** अध्यक्ष महाराज, निश्चित कालमर्यादेत हा प्रश्न आपण सोडविणार आहोत काय?

**सभापती :** माननीय मंत्रिमहोदय या प्रश्नाकडे गंभीरतेने पाहत असल्यामुळे वेळ न घालविता हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने ते प्रयत्न करीत आहेत.

**श्री.बी.टी.देशमुखः** अध्यक्ष महाराज, माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर जी चर्चा झालेली आहे, त्या चर्चेच्या कार्यवृत्ताच्या परिच्छेद क्र. १ शी तुमचा आदेश विसंगत असेल तर तो दुरुस्त करण्यास आपण तयार आहात काय?

**श्री. शिवाजीराव देशमुखः** मी स्वतः लक्ष घालीत आहे. अंतिम निर्णय घेत असतांना शासन या सर्व बाबींचा जरुर विचार करील

******

## कामगार संघटना संयुक्त कृती समिती

**(द्वारा-राज्य सहकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना कार्यालय, नवीन प्रशासन भवन,मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२)**

### *असंघटीत क्षेत्रातील कामगार संघटनांच्या प्रतिनिधींच्या राज्यव्यापी परिषदेत मंजूर करण्यात आलेला ठराव*

आज दिनांक ३० मे २००४ रोजी एस.एम. जोशी फाऊंडेशन हॉल, पुणे येथे असंघटीत क्षेत्रातील कामगार संघटनांच्या कार्यकर्त्यांच्या झालेल्या परिषदेत असंघटीत क्षेत्रातील ३६.९ कोटी कामगारांच्या प्रश्नांबाबत आणि त्यांना कामगार कायद्याद्वारे कोणते संरक्षण मिळाले पाहिजे, तसेच त्यांना सामाजिक सुरक्षेचे फायदे देण्याबाबत सरकारने काय केले पाहिजे, याबाबत विस्तृत चर्चा होवून सदर परिषदेत खालील ठराव मंजूर करण्यात आला.

**ठराव**

"देशातील असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या दयनीय स्थितीबद्दल विचार करुन, त्यांना त्यांचे अधिकार व जगण्याची सुस्थिती प्राप्त व्हावी या जाणिवेतून, कामगार संघटना संयुक्त कृती समिती (मुंबई-महाराष्ट्र) दि.३० मे २००४ रोजी एस.एम. जोशी फाऊंडेशन हॉल, पुणे येथे झालेल्या असंघटीत कामगार संघटनांच्या प्रतिनिधींच्या परिषदेत होत असलेल्या ठरावानुसार खालील मागण्या करीत आहे.

**मागण्या**

१. कामाचा हक्क (राईट टू वर्क) हा मुलभूत हक्कांमध्ये समाविष्ट करण्यासाठी भारतीय राज्य घटनेत त्वरित दुरुस्ती करावी.

२. शेती व प्लँटेशन उद्योगातील कामगारांसाठी स्वतंत्र कायदा लागू करुन त्या कायद्याद्वारे कामगारांना नोकरीची शाश्वती देवून त्यांच्या कामाचे तास निश्चित करावेत. मालकांकडून आर्थिक सहभाग (कॉन्ट्रिब्युशन ) घेवून त्यात सरकारनेही अनुदानाच्या स्वरुपात रक्कम जमा करुन कल्याणकारी निधी कोष उभारावा आणि सदर निधी कोषातून या कामगारांना सामाजिक सुरक्षेचे फायदे देण्याबाबत आणि भविष्य निर्वाह निधी, किमान वेतन, पेन्शन इ. सामाजिक सुरक्षेच्या फायद्यांच्या तरतूदी सदर कायद्यात करुन, कायद्याच्या अंवलबजावणीसाठी सक्षम यंत्रणा या कायद्याद्वारे निर्माण करावी.

३. असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी सर्वसमावेशक कायदा करुन त्या कायद्यात किमान वेतन आणि सामाजिक सुरक्षेची नुसती हमीच नव्हे तर ते बंधनकारक असण्याची तरतूदही करावी व त्या कायद्याच्या अंबलबजावणीसाठी त्रिपक्षीय मंडळे स्थापित करुन त्यांना कायदेशीर हक्क देण्याच्या तरतूदी संबंधीत कायद्यात कराव्यात.

४. कायमस्वरुपी कामासाठी कंत्राटी कामगारांची नेमणूक करु नये. तसेच, कंत्राटी कायद्यात दुरुस्ती करुन कंत्राटी पध्दतीचे निर्मुलन केल्यानंतर तेथे काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना कायम कामगार म्हणून संबंधीत आस्थापनेत/उद्योगात घेण्यात यावे. अशी तरतुद कंत्राटी कामगार (नियमन आणि निर्मुलन) कायदा, १९७० मध्ये करावी. औद्योगिक कलह कायद्यातील कामगाराच्या व्याख्येत कंत्राटी कामगारांचा समावेश करावा.

५. स्वयंरोजगार करणाऱ्या कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा योजना त्वरित तयार करुन अमंलात आणावी.

६. बेरोजगारांना काम द्या. काम देता येत नसेल तर कामगारांना बेरोजगार भत्ता द्या.

वरील मागण्या संबंधीत सरकारला त्वरित पाठविण्याबद्दल समितीने पावले उचलावीत. या मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठी समितीच्या वतीने महाराष्ट्रातील असंघटीत क्षेत्रातील कामगारांचा महाराष्ट्राच्या मंत्रालयावर दिनांक ९ ऑगस्ट २००४ रोजी एक विशाल मोर्चा काढावा व त्यासाठी कृति समितीच्या प्रतिनिधींनी संपूर्ण महाराष्ट्रात दौरा करुन लोक जागृती करावी, असा निर्णय ठरावाद्वारे एकमताने घेण्यात येत आहे.

हा मोर्चा दुपारी ३.०० वा. आझाद मैदान मुंबई येथून निघेल.

# कृषी विद्यापीठातील शिक्षक, संशोधक, प्राध्यापक यांनी सेवानिवृत्तीच्या वय वर्षे ५८ मध्ये सुधारणा करण्याची केलेली मागणी

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन, २००४*
*बुधवार, दिनांक २ जून २००४*

**सर्वश्री. बी.टी.देशमुख, व्ही.यू.डायगव्हाणे, वसंतराव खोटरे. प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते व जी.एल. अैनापुरे** यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

**श्री. बी.टी.देशमुख** (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"३१ मे, २००४ रोजी चारही कृषि विद्यापीठातील शिक्षक/संशोधक प्राध्यापक यांनी काळी फित लावून निषेध आंदोलनाचा घेतलेला कार्यक्रम, आस्टा (अॅकेडेमिक स्टाफ असोशिएशन)च्या अध्यक्ष व सचिवांनी मा. कृषिसचिव यांना, १९ मे, २००४ रोजी किंवा त्या दरम्यान, स्वतंत्रपणे व कुलसचिव, पीकेव्ही यांच्यामार्फत एक निवेदन पाठवून याबाबतची दिलेली पूर्वसूचना, सेवानिवृत्तीचे वय ५८ ऐवजी ६२ करण्याची त्यांनी केलेली मागणी, देशातील सर्व कृषि क्षेत्रातील शिक्षक, प्राध्यापक व संशोधक यांचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षे असावे असा भारत सरकारने काढलेला ३१ ऑक्टोबर २००३ चा आदेश, (क्रमांक F.No.1 (7) 98 - per - V), मुख्य सचिवांना तो कळवूनही कोणतीही कारवाई न होणे, पून्हा ५ नोव्हेंबर २००३ रोजी केंद्र शासनाने याबाबत काढलेले आदेश, दिनांक ३ डिसेंबर २००३ रोजीच्या बैठकीत मा. कृषिमंत्र्यांनी सेवानिवृत्तीचे वय वाढविण्याबाबत कार्यवाही करण्याचे आदेश देऊनही याबाबत कोणतीही कारवाई न होणे, त्यामुळे या शिक्षक/प्राध्यापक/संशोधकात पसरलेला तिव्र असंतोष याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया"

**श्री.गोविंदराव आदिक (कृषी मंत्री )** : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

### निवेदन

केंद्र शासनाने दिनांक ३१ ऑक्टोबर, २००३ रोजीचे कार्यालयीन ज्ञापन क्रमांक-१(७)/९८-पर्सोनेल-६ अन्वये राज्य कृषि विद्यापीठे व मध्यवर्ती कृषि विद्यापीठ इम्फाळ येथील शिक्षक वर्गीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय दिनांक १३ ऑक्टोबर, २००३ पासून ६० वर्षावरुन ६२ वर्ष करण्याबाबत मान्यता दिली आहे. तसेच अवर सचिव, कृषि मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दि. ५ नोव्हेंबर, २००३ च्या पत्रान्वये या प्रकरणी राज्यातील कृषि विद्यापीठांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात अशी विनंती मुख्य सचिव यांना केली आहे.

कृषी विद्यापीठातील शिक्षकांचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्ष करण्याबाबत डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला येथील प्राध्यापक संघटनेने शासनाकडे मागणी केली आहे. प्राध्यापक संघटनेची ही मागणी व अन्य मागण्यांबाबत दि. ३१ डिसेंबर, २००३ रोजी प्राध्यापक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांबरोबर मा. मंत्री (कृषी) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्याने दि. ३१ मे, २००४ रोजी चारही कृषि विद्यापीठातील सर्व शिक्षक/संशोधक/प्राध्यापक काळी फीत लावून निषेध नोंदविणार असल्याचे अध्यक्ष, कृति समिती प्राध्यापक संघटना, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांनी शासनास दि. १९ मे, २००४ च्या पत्रान्वये कळविले आहे.

राज्यातील कृषी विद्यापीठातील शिक्षक वर्गीय कर्मचाऱ्यांना दि. १.१.१९७३ पासून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचे आदेश दि. १७.३.१९८९ व दि. ३०.१२.१९९९ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेली वेतनश्रेणी लागू करतांना शिक्षक वर्गीय कर्मचाऱ्यांसाठी ६० वर्ष अशी सेवानिवृत्तीची वयोमर्यादा शिफारस केलेली आहे. तथापि, सदर शिफारस सक्तीची नसल्याने राज्यातील कृषी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्ष ठेवण्यात आलेले आहे. महाराष्ट्र कृषी विद्यापीठ परिनियम १९९० मधील परिनियम १३८ (१) नुसार कृषी विद्यापीठातील शिक्षक वर्गीय आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सर्व भाग) लागू करण्यात आले आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम क्रमांक १० (१) मधील तरतुदीनुसार वर्ग - ४ चे शासकीय कर्मचारी वगळता इतर सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना सेवानिवृतीची वयोमर्यादा ५८ वर्षे ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे या नियमाप्रमाणे राज्यातील कृषी विद्यापीठातील सर्व कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ निश्चित करण्यात आलेले आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील सहयोगी प्राध्यापकांनी सेवानिवृत्तीचे वय ६० वर्ष करण्याच्या मागणीबाबत मा. उच्च न्यायालय खंडपिठ, नागपूर येथे दाखल केलेली याचिका क्रमांक १४४८/१९९३ मध्ये दि. २२ जुलै, १९९४ रोजी दिलेल्या निर्णयानुसार कृषी विद्यापीठातील शिक्षक वर्गीय कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरून ६० वर्ष करण्याबाबतची मागणी फेटाळून लावली आहे. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील आस्टा संघटनेने मागणी केल्यानुसार कृषी विद्यापीठातील शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षाऐवजी ६२ वर्ष करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

**श्री. बी.टी.देशमुख** : या लक्षवेधीवर जे निवेदन वितरित केलेले आहे त्यामध्ये २२ जुलै १९९४ चा नागपूर खंडपीठाचा निर्णय सांगितलेला आहे. नागपूर खंडपीठाने त्यावेळी असे सांगितले की, हा शासनाचा अधिकार आहे आणि ती गोष्टी आम्ही अमान्य करीत नाही. १९९४ नंतर यामध्ये पुष्कळ बदल झालेले आहेत. या देशाच्या घटनेप्रमाणे राज्य सूचीमध्ये १४ व्या क्रमांकावर 'कृषी विषयक शिक्षण व संशोधन' हा विषय आहे. केन्द्र सूचीमध्ये ६६ व्या क्रमांकावर 'उच्च शिक्षणाच्या संशोधन संस्था, वैज्ञानिक आणि तांत्रिक संस्था' आहेत. त्यामधील दर्जाचे समन्वयन आणि निर्धारण हा केन्द्राचा विषय आहे. इंडियन कौन्सिल ऑफ अॅग्रीकल्चरल रिसर्च या नावाची शिर्षस्थ संस्था कृृषी खात्यामध्ये केंद्र स्तरावर काम करते. त्यांनी मॅन्डेटरी अशा प्रकारचे लेजिस्लेशन केलेले नाही. त्यांनी आपणाकडे ३१ ऑक्टोबर २००३ला सूचना पाठविलेल्या आहेत. त्याबाबतीत निवेदनामध्ये 'होय' असे उत्तर दिलेले आहे. त्यानंतर ५ नाव्हेंबर २००३च्या पत्रान्वये वयोमर्यादा ५८ ची ६२ करावी अशा सूचना त्यांनी पाठविल्या का ? या प्रश्नालाही 'होय' असे म्हटलेले आहे. एका प्रश्नाचे उत्तर निवेदनामध्ये दिलेले नाही. सन्माननीय कृषी मंत्री श्री. गोविंदरावजी आदिक यांनी या सर्व मंडळींना बोलावून त्यांच्याशी चर्चा केली होती. त्या चर्चेचे कार्यवृत्त माझ्यासमोर आहे. ३१.१२.२००३ ला ही चर्चा झाली. या चर्चेमध्ये मा. आयुक्त कृषी यांनी सध्या विद्यापीठातील प्राध्यापकांच्या सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ६० पर्यन्त करावी असे सांगितलेले आहे. मा.मंत्रिमहोदयांनी असे सूचित केले की, "**कृषी विद्यापीठातील प्राध्यापकांना पारंपारिक विद्यापीठातील प्राध्यापकांप्रमाणे सर्व सेवाशर्ती ह्या सारख्याच असल्यामुळे सर्वांना समानतेचे तत्व लागू करण्याबाबत कार्यवाही करावी.**" तेव्हा आता मी मुद्दाम ५८ ते ६२ वयोमर्यादेचा प्रश्न विचारीत नाही. कारण याबाबतीत आपण आदेश दिलेले आहेत. मा.कृषीमंत्री हे ज्येष्ठ मंत्री आहेत, या प्रश्नासंबंधी त्यांनी बैठक घेऊन चर्चा केली. प्राध्यापकांचेही परवा आंदोलन झाले. त्यांच्याकडून अत्यंत कटू प्रकारच्या भावना व्यक्त होत आहेत. माझे म्हणणे असे आहे की, ५८ ते ६२ हा विषय बाजूला ठेवा. मंत्रिमहोदयांनी बैठकीत चर्चा करुन निर्णय घेतलेला आहे, आदेश दिलेले आहेत ते आदेश ८-१० किंवा १५ दिवसात निर्गमित होतील याची काळजी घेतली जाईल काय?

**श्री. गोविंदराव आदिक** : या सदनाचे ज्येष्ठ सदस्य श्री. बी.टी.देशमुख यांनी माझ्या अध्यक्षतेखाली जी बैठक झाली त्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून दाखविले. कार्यवृत्तामध्ये काय आहे यापेक्षा जी काही चर्चा झाली ती मा.सदस्यांना आठवत असेल. निर्णय घेण्यासाठी ती चर्चा नव्हती. चर्चा करुन मार्ग काढण्यासाठी आपण एकत्र बसलो होतो. या चर्चेच्या वेळी मी असे मत व्यक्त केले होते की, सरकारी महाविद्यालयातील किंवा विद्यापीठातील नियम आणि खाजगी विद्यापीठातील नियम यामध्ये तफावत आहे. म्हणून सेवानिवृत्तीचे वय सगळीकडे सारखे असेल तर बरे होईल. तेव्हा ही बाब तपासून घेऊन आपल्याला जर योग्य वाटले तर त्याबाबतीत कार्यवाही

करावी अशा त-हेची सर्वसाधारणपणे चर्चा होती. मी काही आदेश दिलेले नव्हते किंवा निर्णय घेतलेला नव्हता. हा विषय एकट्या कृषी विभागाचा नाही. महाराष्ट्र राज्य शासनाच्या अंतर्गत जे सर्व कर्मचारी आहेत त्या सर्वांचे सेवाशर्तींचे नियोजन सामान्य प्रशासन खात्या मार्फत केले जाते. त्यामुळे अशा प्रकारचा कोणताही निर्णय कोणताही विभाग एकट्याने घेऊ शकत नाही. ज्यावेळी ही चर्चा करण्याचा प्रयत्न केला त्यावेळी त्याबाबतीत अनुकूलता दिसली नाही. उलटपक्षी ५८ पेक्षा जास्त वयोमर्यादा वाढवू नये,कारण महाराष्ट्र सरकारच्या सर्वच कर्मचा-यांसाठी जे नियम मान्य केलेले आहेत त्यामध्ये ५८ ही वयोमर्यादा असल्यामुळे तीच मर्यादा सर्वांना लागू करावी अशा प्रकारचे मत अनेक ठिकाणी व्यक्त झाले. आपण महाराष्ट्र शासनाच्या कर्मचा-यांसाठी जे नियम मान्य केलेले आहेत ते सर्वाना लागू करावेत. म्हणून निवृत्तीचे वय ६० देखील करु नये ते ५८ ठेवावे अशाप्रकारचे मत अनेक ठिकाणी व्यक्त झाले. म्हणून तो निर्णय एकटा कृषी विभाग घेऊ शकेल अशी परिस्थिती नाही. आम्ही पुन्हा सर्व विभागांशी चर्चा करीत आहोत. शेवटी राज्य शासन म्हणून सर्व विभागांना लागू करण्यासाठी हा निर्णय घ्यावा लागेल. हा निर्णय झालेला नाही. सूचना जरुर होती, तशी चर्चा होती.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदया, सर्व कर्मचा-यांसोबत यांना गृहीत धरणे बरोबर नाही. आपले लेखी कार्यवृत्त आहे आणि मी ते वाचून दाखविलेले आहे. इतर सर्व विद्यापीठामध्ये हे निवृत्तीचे वय ६० वर्षे आहे.

**श्री.गोविंदराव आदिक** (बसून) : ते खाजगी विद्यापीठात आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** हे खरे नाही. महाराष्ट्रातील सर्व पारंपारीक विद्यापीठांमध्ये ६० आहे, ती खाजगी विद्यापीठे नाहीत. मी त्यांची नावे सांगू कां ? काही सरकारी महाविद्यालयात असेल तर ते सोडून द्या. ज्या नॉन ॲग्रीकल्चरल युनिर्व्हसिटीज आहेत त्या सर्व विद्यापीठांमध्ये प्राध्यापकांच्या, शिक्षकांच्या, संशोधकांच्या सेवा निवृत्तीचे वय हे ६० वर्षे आहे. आपल्या

---

**क्रमांक कृषीआ-११०४/प्र.क्र.१०७/६अे**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक १७ जून २००४**

बैठकीची सुचना दिनांक २१ जून २००४ सायंकाळी ५.०० वा.

प्रति,

१. श्री.बी.टी.देशमुख, विधानपरिषद सदस्य, ३ सुबोध कॉलनी, विदर्भ महाविद्यालयाजवळ, अमरावती - ४४४ ६०४.

२. श्री.व्ही.यु.डायगव्हाणे, विधानपरिषद सदस्य, वार्ड नं. ५, श्रीनगर लेआउट, बॅचलर रोड, वर्धा

३. श्री. वसंतराव खोटरे, विधानपरिषद सदस्य, तिसरी लाईन, तापडीया नगर, अकोला ता.जि.अकोला ४४४ ००५

४. श्री. प.म.पाटील, विधानपरिषद सदस्य, सोमेश्वर हायस्कुल, घाटनांदूर ता. अंबेजोगाई जि.बीड

५. श्री. नानासाहेब बोरस्ते, विधानपरिषद सदस्य, निलगीरी, जुना गंगापूर नाका, नाशिक-५

६. श्री.जी.एल.अैनापूरे, विधानपरिषद सदस्य, पंढरपूर रोड, मिरज, जि. सांगली

७. प्रधान सचिव, (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

८. प्रधान सचिव, (सेवा) सामान्य प्रशासन विभाग,

९. सचिव, (विधी) विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई -३२

१०. सचिव, (कृषि) कृषि व पदूम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

११. आयुक्त (कृषि) नि सदस्य सचिव, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद भांबुर्डा, भोसले नगर पूणे ४११ ००७.

**विषय :** राज्यातील कृषि विद्यापीठांतर्गत प्राध्यापकांचे निवृत्तीचे वय वाढविण्याबाबत.

महोदय,

विषयाधीन प्रकरणी मा. मंत्री (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली मा. मंत्री (कृषि) यांच्या मंत्रालयातील दालनामध्ये (दुसरा माळा, मंत्रालय, मुंबई-३२) दि. २१ जून २००४ रोजी सायंकाळी ५.०० वाजता बैठक आयोजित केली आहे. सदर बैठकीस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपली विश्वासु
**(स्वाती पालकर)**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

---

मिनिटमध्येही ते लिहिलेले आहे. सभापती महोदया, मी आपल्याला एक सांगू इच्छितो की, देशाच्या लेव्हलला समन्वयन करण्यासाठी जी बॉडी आहे तिने निवृत्तीचे वय ६२ वर्षे असावे असे म्हटलेले आहे. भारत सरकारने यांच्याकरिता हे वय ६२ वर्षे असावे असे म्हटलेले आहे.आपण ते बाजुला ठेवू. आपण बैठक घेतली व चर्चा केली. त्यांना म्हणजे या शिक्षकांना व संशोधकांना इतर कर्मचा-यांच्या बरोबर ठेवणे हे बरोबर नाही.

**श्री.गोविंदराव आदिक** (बसून) : हे तुमचे म्हणणे बरोबर नाही हे त्याच वर्गातील आहेत.

**प्रा.बी.टी.देशमुख :** निर्विवादपणे हे निवृत्तीचे वय सर्व विद्यापीठामध्ये ६० वर्ष आहे. आपण महाराष्ट्रातील एका विद्यापीठाचे नांव सांगा की ज्या विद्यापीठामध्ये निवृत्तीचे वय हे ६० च्या ऐवजी ५८ वर्षे आहे. महाराष्ट्रात असे एकही पारंपारीक विद्यापीठ नाही. असा विषय मिक्सअप करणे म्हणजे तेथील मंत्रालयातील लिखापढी करणा-या मंडळीना असे वाटते की, आम्ही मंत्रालयात बसतो आमचे निवृत्तीचे वय ५८ मग हयांचे ते ६० वर्ष कां असावे? या अहंकारातून थोडेसे बाहेर निघण्याची आवश्यकता आहे. आपल्याला चुकीची माहिती सांगण्यात आलेली आहे. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठात ते ६० आहे व सर्व विद्यापीठात सारखेच आहे. तसे नसेल तर एका तरी विद्यापीठाचे नाव आपण सांगा असे मी आपणास दोन वेळा म्हटले पण आपण जागेवरुन उठलाच नाही. माझे म्हणणे असे आहे की, हे सुध्दा विद्यापीठातील लोक आहेत. **ते कृषी विद्यापीठात आहेत हा त्यांचा गुन्हा आहे कां ? महाराष्ट्रातील इतर नॉन ॲग्रीकल्चरल युनिर्व्हसिटीमध्ये जर हे निवृत्तीचे वय ६० असेल तर यांच्या बाबतीत ६० वर्षासंबंधीचे आदेश काढले जातील कां ?**

**श्री.गोविंदराव आदिक :** मी आताच सांगितले की, हा निर्णय एक विभाग घेऊ शकणार नाही. शासन म्हणून बाकीच्यांशी चर्चा, सल्लामसलत करुनच निर्णय घ्यावा लागतो याची आपल्याला कल्पना आहे. आम्ही जरुर त्यासंबंधी त्यांच्याकडे आग्रह धरु व पुन्हा प्रयत्न करु.

**प्रा.बी.टी.देशमुख :** जर इतर विद्यापीठामध्ये हे वय ६० वर्ष आहे तर मग आपल्या कृषी विद्यापीठाला सुध्दा ते तसेच लागू केले जाईल याबाबतचा प्रयत्न केव्हा पूर्ण कराल.

**श्री.गोविंदराव आदिक :** आपण प्रश्न विचारला म्हणून मी आपल्याला थोडीशी माहिती देऊ इच्छितो. इतर विद्यापीठातील शासकीय महाविद्यालयात...

**प्रा.बी.टी.देशमुख** :याठिकाणी विद्यापीठासंबंधीचा विषय चालू आहे. शासकीय महाविद्यालयाच्या बाबतीत कोर्टाचा निर्णय आहे. हा कोर्टाचा निर्णय काय आहे? तर शासकीय महाविद्यालयाच्या बाबतीत शासनाने ठरवावयाचे आहे असा सुप्रिम कोर्टाने निर्णय दिलेला आहे. दुर्दैवाने त्यांच्याबाबतीत ५८ वर्षे आहे हे खरे आहे. मंत्रालयातील कारकुनांनी त्याबाबतीत कुरघोडी केली हे खरे आहे.

**श्री.गोविंदराव आदिक : कृषी खेरीज इतर विद्यापीठामध्ये जी महाविद्यालये आहेत. त्यामध्ये निवृत्तीचे वय ५८ वर्षे आहे.**

**प्रा.बी.टी.देशमुख :** ही सुद्धा आपली माहिती चुकीची आहे. मी महाविद्यालयासंबंधी सुध्दा सांगतो. ९८ टक्के महाविद्यालयांमध्ये निवृतीचे वय ६० आहे. फक्त सरकारी महाविद्यालयामध्ये ते ५८ वर्षे आहे. माझे म्हणणे असे आहे की, या मंत्रालयातील कारकून मंडळीच्या म्हणण्याप्रमाणेच सर्व चालेल कां ? जरा विषय समजून घ्या. तेथे हे वय ५८ कां आहे? तर मंत्रालयात ते ५८ आहे म्हणून. हा जो मंत्रालयातील उप सचिव आहे त्याला काय वाटते? तर ते शासकीय कॉलेजमधील प्रोफेसर असतील पण मी मंत्रालयात इतके दिवस डेप्युटी सेक्रेटरी म्हणून आहे. ते हायकोर्टात जिंकले, सुप्रिम कोर्टात वेगळेच झाले. सुप्रिम कोर्टाने म्हटले की, हा शासनाचा अधिकार आहे "तेव्हा शासनाने ठरवावे." मंत्रालयामध्ये नोकरशाही मोठी जोरदार आहे. सर्व विद्यापीठांमध्ये विद्यापीठाच्या शिक्षकांकरिता निवृत्तीचे वय ६० वर्ष आहे. महाविद्यालये म्हणाल तर फक्त शासकीय महाविद्यालये सोडून सर्व ९८ टक्के महाविद्यालयात निवृत्तीचे वय ६० वर्षे आहे. माझे म्हणणे असे आहे की, आपल्या विद्यापीठातील लोकांचा ते केवळ कृषी विद्यापीठात आहेत एवढाच गुन्हा आहे कां ? आपण चांगली भूमिका घेतली हे मिनिटमध्ये आहे मी ते पुन्हा वाचून दाखवितो. आपण संघटनेशी चर्चा केली तेव्हा त्या बैठकीला मी नव्हतो. मला त्या बैठकीचे मिनिटस् मिळालेले आहे. मी आपल्याला पुन्हा ते मिनिटस् वाचून दाखवतो. त्यात असे म्हटलेले आहे की, "या संदर्भात माननीय आयुक्त यांनी सध्या विद्यापीठातील प्राध्यापकांची सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ६० पर्यन्त करावी असे सांगितले आहे.माननीय मंत्रिमहोदयानी असे सूचित केले की, कृषी विद्यापीठातील प्राध्यापकांना

पारंपारिक विद्यापीठातील प्राध्यापकांप्रमाणे सर्व सेवाशर्ती सारख्याच असल्यामुळे सर्वांना समान तत्व लागू करण्या बाबत कार्यवाही करावी." आपण Highest person occupying the highest seat in the Department. आहात. तुमच्याशी बोलल्यानंतर पुन्हा कारकून मंडळी उलट करुन देतात अशा प्रकारचा मेसज सिनिअर मंत्रिमहोदयांच्या बाबतीत बाहेर जाणे हे बरोबर नाही.

**श्री.गोविंदराव आदिक :** सभापती महोदया,मी माननीय सदस्यांना अत्यंत नम्रपणे सांगतो की केवळ एकच विभाग यासबंधीचा निर्णय घेऊ शकत नाही.वित्त विभाग, नियोजन विभाग, सामान्य प्रशासन विभाग इत्यादी विभागाकडे फाईल जात असते याची त्यांना सुध्दा कल्पना आहे. तेव्हा त्यादृष्टीने काय करता येईल यासाठी आपण प्रयत्न करु. त्या बाबतीत आपल्याबरोबर आणि इतरांबरोबर चर्चा करुन यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करु.

**श्रीमती फौजिया खान :** सभापति महोदय, यहां जो चर्चा हो रही है कि दूसरे विभागों की तरह युनिवर्सिटी में भी रिटायरमेंट के लिए आयु के संबंध में एक ही नियम लगाने की जरुरत पड़ेगी. मैं यह समझती हूं कि और जब भारत सरकार यह समझती है कि रिटायरमेंट के लिए ज्यादा उम्र होनी चाहिए, आईसीएआर समझती है कि रिटायरमेंट के लिए ज्यादा उम्र होनी चाहिए तो उसका कारण यह है कि विद्यापीठ ऐसी संस्था है जहां पर नॉलेज देने और लेने की बात होती है और नॉलेज उम्र के साथ साथ बढ़ता रहता है. विद्यापीठ में किये जाने वाले रिसर्च, अनुभव उपयोगी हो सकता है. इसलिए विद्यापीठों के संबंध में रिटायरमेंट के लिए उम्र तय करने के बारे में अलग से विचार होना चाहिए. इसलिए मेरा यह अनुरोध है कि कृषि विद्यापीठों के अन्तर्गत कार्यरत शिक्षक, संशोधक और प्राध्यापकों की सेवा निवृत्ति की उम्र बढ़ाने के बारे में मंत्री महोदय द्वारा जरुर प्रयत्न किया जाना चाहिए.

**श्री.गोविंदराव आदिक :** मी अगोदरच सांगितले आहे की, अजून निर्णय घेतला आहे आणि चर्चा बंद केलेली आहे असे झालेले नाही. इतरांबरोबर चर्चा करुनच निर्णय घ्यावा लागेल.त्यासाठी थोडेसे थांबण्याची आवश्यकता आहे असे माझे म्हणणे आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :**सर्वांशी आापण बोला परंतु बोलण्याचे पॅरामिटर्स आपण अगोदर ठरवा.क्लार्कच्या बरोबरीने त्यांना बसवू नका.......

**श्री.गोविंदराव आदिक :** त्यासाठी आपल्यालासुध्दा विश्वासात घेण्यात येईल.

**श्री.बी.टी.देशमुख :** मला काही विश्वासात घेवू नका. गव्हर्नमेन्ट ऑफ इंडिया,आय.सी. अे. आर.यांना विश्वासात घ्या.

**श्री.गोविंदराव आदिक :** आपल्याला तसेच त्यांनाही विश्वासात घेण्यात येईल तसेच संबंधित विभागाबरोबर चर्चा करुन एक विचाराने निर्णय घेऊ.

**डॉ.अशोक मोडक :** या चर्चेचा रोख लक्षात घेतला तर असे दिसते की,

## कृषी व पदुम विभाग /६ अे

## राज्यातील कृषि विद्यापीठांतर्गत प्राध्यापकांचे निवृत्तीचे वय वाढविण्याबाबत मा.मंत्री (कृषी) यांच्या अध्यक्षतेखाली दि. २१.६.२००४ रोजी दुपारी ५.०० वाजता आयोजित केलेल्या बैठकीची टिप्पणी

केंद्र शासनाने दि. ३१ ऑक्टोबर, २००३ रोजीचे कार्यालयीन ज्ञापन क्रमांक-१ (७) /९८ पर्सोनेल-६ अन्वये राज्य कृषि विद्यापीठे व मध्यवर्ती कृषी विद्यापीठ, इम्फाळ येथील शिक्षक वर्गीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय दि. ३१ ऑक्टोबर, २००३ पासून ६० वर्षावरून ६२ वर्ष करण्याबाबत मान्यता दिली आहे. तसेच अवर सचिव, कृषि मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दि. ५ नोव्हेंबर, २००३ च्या पत्रान्वये या प्रकरणी राज्यातील कृषी विद्यापीठांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात अशी विनंती मुख्य सचिव यांना केली आहे.

कृषी विद्यापीठातील शिक्षकांचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षे करण्याबाबत डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला येथील प्राध्यापक संघटनेने शासनाकडे मागणी केली आहे. प्राध्यापक संघटनेची ही मागणी व अन्य मागण्याबाबत दि. ३१ डिसेंबर, २००३ रोजी प्राध्यापक संघटनेच्या पदाधिकाऱ्याबरोबर मा. मंत्री (कृषी) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्याने दि. ३१ मे, २००४ रोजी चारही कृषि विद्यापीठातील सर्व शिक्षक/संशोधक/प्राध्यापक काळे फित लावून निषेध नोंदविण्यात आला.

राज्यातील कृषि विद्यापीठातील शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांना दि. १.१.१९७३ पासून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचे आदेश दि. १७.३.१९७९ व दि. ३०.१२.१९९९ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेली वेतनश्रेणी लागू करताना शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांसाठी ६० वर्ष अशी सेवानिवृत्तीची वयोमर्यादा विद्यापीठ अनुदान आयोगाने तसेच भारतीय कृषी अनुसंधान परिषदेने शिफारस केलेली आहे. तथापि सदर शिफारस सक्तीची नसल्याने राज्यातील कृषी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्ष ठेवण्यात आलेले आहे. महाराष्ट्र कृषी विद्यापीठ परिनियम १९९० मधील परिनियम १३८ (१) नुसार कृषी विद्यापीठातील शिक्षक वर्गीय आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सर्व भाग) लागू करण्यात आले आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन) नियम १९९८ मध्ये नियम क्रमांक १०१ मधील तरतुदीनुसार वर्ग ४ चे शासकीय कर्मचारी वगळता इतर सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ५८ वर्ष ठेवण्यात आलेली आहे. त्यानुसार कृषी विद्यापीठातील सर्व कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षे असे निश्चित करण्यात आले आहे.

डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील सहयोगी प्राध्यापकांनी सेवानिवृत्तीचे वय ६० वर्ष करण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठामध्ये दाखल केलेल्या याचिका क्रमांक १४४८/१९९३ मध्ये दि. २२ जुलै, १९९४ रोजी दिलेल्या निर्णयानुसार कृषि विद्यापीठातील शिक्षक वर्गीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६० वर्ष करण्याबाबतची मागणी फेटाळून लावलेली आहे.

केरळ शासनाने त्यांचेकडील शिक्षक वर्गीय कर्मचाऱ्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाची वेतनश्रेणी लागू करतांना सेवानिवृत्तीचे वय ५५ वर्ष निश्चित केलेले होते. त्यासंदर्भात तेथील शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या अपिलावर केरळ शासनाच्या बाजूने निर्णय देतांना सर्वोच्च न्यायालयाने असे स्पष्ट केले आहे की, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्ष असावे असे राज्य शासनास बंधनकारक नाही. कारण असे बंधन असल्याचे संविधिक महादेश (स्टॅच्युटरी मॅन्डेट) नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाची वेतनश्रेणी लागू करण्याची योजना संपूर्ण स्विकारावी किंवा स्विकारू नये अथवा योजनेचा काही भाग स्विकारावा ही संपूर्णपणे राज्यशासनाच्या अखत्यारीतील बाब आहे. त्यामुळे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्ष ठेवण्याची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळलेली आहे. ही याचिका फेटाळताना मा. सर्वोच्च न्यायालयाने असेही मत व्यक्त केले आहे की, तरुण पिढीला रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे तसेच खालील स्तरावरील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने विहित मुदतीनुसार सेवानिवृत्तीसाठी वयोमर्यादा निश्चित करताना या गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहे.

पारंपारिक विद्यापीठातील शासकीय महाविद्यालयातील शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांना ५८ वर्षे ही सेवानिवृत्तीची वयोमर्यादा आहे. तथापि अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांना मात्र सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ६० वर्षे आहे. कृषी विद्यापीठातील आणि पारंपारिक विद्यापीठातील शिक्षकवर्गीय पदांच्या कर्तव्य आणि जबाबदाऱ्या भिन्न स्वरुपाच्या आहेत. कृषी विद्यापीठातील शिक्षण वर्गीय पदांना संशोधनाची म्हणजेच प्रत्यक्ष क्षेत्रीय कामे करावी लागतात. आणि क्षेत्रिय कामाच्या दृष्टीने पुढील काळात शारिरीक क्षमता असणेही तेवढेच आवश्यक आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन कृषी विद्यापीठातील शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय वाढविण्याबाबतचा निर्णय घेणे आवश्यक आहे.

निवृत्तीचे वय ५८ वर्षा ऐवजी ६२ वर्ष करा असे कोणी म्हणत नाही. सर्वाबरोबर आपण चर्चा करीत आहात ही आनंदाची बाब असून आपला पॉझिटीव्ह अप्रोच आहे, कृषी विद्यापीठाच्या प्राध्यापकांच्या बाबतीत भेदभाव केला जातो असा अकारण ठपका आपल्यावर येऊ शकतो.चर्चेच्या अनुषंगाने अनायसे पॅरिटी प्रिन्सीपल आपल्याला अंमलात आणता येईल आणि तोच मुख्य मुद्दा आहे. म्हणून मला आपल्याला अशी विनंती करावयाची आहे की, सेवानिवृत्तीचे वय ५८ ऐवजी ६० करण्याच्या बाबतीत चर्चा केली जाईल आणि अनुकूल निर्णय घेतला जाईल असे जर आपण सांगितले तर चर्चेचा शेवट सुखद होईल.

**श्री.गोविंदराव आदिक :** मी पुन्हा अत्यंत नम्रपणे आपल्याला सांगू इच्छितो की, शासनाने या संदर्भात अंतिम निर्णय घेऊन चर्चेचे दरवाजे बंद केलेले नाही.हा विषय काही संपलेला नाही. चर्चा केल्यानंतर ६२ ऐवजी ६० वर्षापर्यन्त आपण आलो आहोत. **ज्यांचे निवृत्तीचे वय ५८ आहे त्यांचे वय ६० करण्याच्या बाबतीत सुध्दा प्रश्न निर्माण झालेला आहे.एकूण सर्व कर्मचा-यांसाठी हे वय ५८ वर्षे आणि प्राध्यापकांसाठी मात्र ६० वर्षे असा भेदभाव होणार आहे** त्याकरता कटुता निर्माण होऊ नये म्हणून चर्चा करुन एकविचाराने, एक मताने निर्णय घेऊ.

**श्री.बी.टी.देशमुख :**गव्हर्नमेन्ट ऑफ इंडियाला आणि आय.सी.अे. आर.ला बाजूला ठेवण्यात येत आहे.हे बरोबर आहे काय?

**श्री.गोविंदराव आदिक** :इतर विद्यापीठामध्ये,काही महाविद्यालयामध्ये हे वय ५८ वर्षाचे आहे.

**श्री. बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, हे सर्व पारंपारिक विद्यापीठांमध्ये ६० वर्षे आहे. आता ॲफिलिएटेड कॉलेजांमध्ये देखील ६० आहे आणि हे सारे ऑल इंडिया पातळीवर ठरलेले आहे. हे आयसीएआरने आपल्याला लिहिले आहे. फक्त शासकीय कॉलेजांमधील शिक्षकांचा मंत्रालयाने छळ यशस्वीपणे केलेला आहे हे खरे आहे. आपल्या मंत्रालयातील क्लरिकल मंडळींनी हा छळ केलेला आहे. परंतु ९८ टक्के महाविद्यालयांमध्येसुध्दा ते ६० वर्ष आहे. अध्यक्ष महाराज, बाहेर ही भावना जाऊ नये की, मा.मंत्री महोदय बसून येथे चर्चा करतात ... आम्हीही येथे ६२ करा असे म्हटलेले नाही. परंतु तुम्ही एक निर्णय घेतला होता. आपण काय कबूल केले होते तेही मी वाचून दाखविले. शासकीय कॉलेजांचे बाबतीत जो छळ मंत्रालयातील कारकुनांनी केला तो बाजूला ठेवून इतर प्राध्यापकांप्रमाणे निर्णय घेण्याचा प्रयत्न आपण कराल काय इतकाच माझा प्रश्न आहे.

**श्री. गोविंदराव आदिक :** जरूर तसा प्रयत्न केला जाईल.

**श्रीमती नीलम गोऱ्हे :** अध्यक्ष महाराज, मघापासून चर्चेचे बरेच प्रकार आमच्या लक्षात आले आहेत. त्यामुळे एक अंतिम आश्वासन मंत्री महोदयांकडून पाहिजे. आता ही जी चर्चा आपण करणार आहात ती चर्चा तो निर्णय घेण्याच्या दृष्टीनेच होणार आहे ना ?

**श्री. गोविंदराव आदिक :** अध्यक्ष महाराज, खरे म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांचे समाधान झाले आणि असे असताना सन्माननीय सदस्या श्रीमती गोऱ्हे यांच्या मनामध्ये शंका का रहावी हे मला कळत नाही. येथे कोणाही पेक्षा शंका-समाधान ज्यांचे लवकर होत नाही त्यांचेही समाधान झाले आहे तर मग आपल्याही मनात काही शंका राहू नये.

******

## "राज्यातील कृषी विद्यापिठांतर्गत प्राध्यापकांच्या सेवानिवृत्तीच्या वयामध्ये वाढ करणे" या विषयावर मा. कृषी मंत्री यांनी बोलाविलेली बैठक.

राज्यातील कृषी विद्यापिठांतर्गत प्राध्यापकांचे सेवानिवृत्तीचे वय वाढविण्याबाबत" या विषयावर मा. कृषी मंत्री यांनी मंत्रालयातील त्यांच्या दालनामध्ये दि. २१ जून, २००४ रोजी दुपारी ५.०० वाजता एक बैठक आयोजित केली होती. ही बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली ठरलेल्या वेळी पार पडली. या बैठकीला पुढील विधानपरिषद सदस्य उपस्थित हाते :- सर्वश्री. बी. टी. देशमुख, व्ही. यु. डायगव्हाणे, वसंतराव खोटरे, प. म. पाटील, नानासाहेब बोरस्ते, जी. एल. अैनापुरे. त्याशिवाय कृषी सचिव, कृषी आयुक्त व इतर विभागांचे अधिकारीसुध्दा या बैठकीला हजर होते.

२. बैठकीमध्ये सुरुवातीलाच कृषी व पदुम विभाग यांच्यामार्फत "राज्यातील कृषी विद्यापिठाअंतर्गत प्राध्यापकांचे सेवानिवृत्तीचे वय वाढविण्याबाबत मा. मंत्री ( कृषी ) यांच्या अध्यक्षतेखाली दि. २१ / ६ / २००४ रोजी दुपारी ५.०० वाजता आयोजित केलेली बैठक" या मथळयाची एक टिप्पणी विभागातर्फे प्रसृत करण्यात आली होती. सभागृहात या विषयावर दि. २ जून, २००४ रोजी झालेल्या चर्चेच्या अधिकृत प्रतिवेदनाची प्रत आमच्या सोबत होती व आम्ही अगदी सुरुवातीलाच त्या अधिकृत प्रतिवेदनामध्ये व उपरोक्त टिप्पणीमध्ये शासनातर्फे मांडल्या गेलेले अत्यंत चुकीचे मुद्दे मा. मंत्री महोदयांच्या लक्षात आणून दिले.

३. महाराष्ट्रातील कोणत्याही विद्यापिठामध्ये शिक्षकांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षे नाही ही गोष्ट कागदोपत्री मा. मंत्री महोदयांच्या लक्षात आणून देण्यात आली. महाराष्ट्रातील विद्यापिठाशी संलग्न असलेल्या सर्व अशासकीय महाविद्यालयांमध्येसुध्दा सेवानिवृत्तीचे वय हे ५८ वर्षे नसून ते ६० वर्षे आहे ही गोष्टसुध्दा मा. मंत्री महोदयांच्या लक्षात आणून देण्यात आली. खुद्द कृषी विद्यापीठाशी संलग्न अनुदानित अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ नसून ६० आहे ही गोष्टसुद्धा आम्ही सांगितली. या शिक्षक, प्राध्यापकांच्या सेवाशर्ती या परिनियमानुसार ठरविण्याची तरतूद कायद्यात आहे. करण्यात आलेल्या पहिल्या परिनियमात त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू करण्याचा उल्लेख असल्यामुळे त्यांना ५८ वर्षांची अट लागू करणे अनुचित असून इतर सर्व विद्यापिठांच्या परिनियमाची व्यवस्था त्यांना लागू केली पाहिजे असे प्रतिपादन आमच्यातर्फे करण्यात आले. शिवाय, केंद्र शासनाकडून पाचव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी लागू करताना ८० टक्के रक्कमेचे सहाय्य राज्य शासनाला मिळाले असून राज्य शासनाने केंद्र शासनाच्या सर्व अटी लिखित स्वरुपात मान्य केल्यानंतरच ही मदत देण्यात आलेली आहे. त्यामुळे ५८ वर्षे वयाची अट तातडीने बदलणे गरजेचे आहे असेही आमच्यातर्फे सांगण्यात आले. इतर अनेक अनुषांगिक मुद्दे चर्चेत प्रतिपादित करण्यात आले. शासनाच्यावतीने टिप्पणीमध्ये असलेल्या मुद्याचे प्रतिपादन करण्यात आले.

४. शेवटी मा. मंत्री महोदयांनी ही गोष्ट मान्य केली की, या शिक्षकांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे ठेवणे ही रास्त गोष्ट आहे. परंतु, त्याचबरोबर त्यांनी या बैठकीत असेही नमूद केले की, या बाबतचा निर्णय एकटा कृषी विभाग घेऊ शकत नाही. तर त्यासाठी सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभाग यांच्याकडे नस्ती पाठवावी लागेल. आमच्या खात्यामार्फत ६० व्या वर्षी सेवानिवृत्ती वयाचा प्रस्ताव तयार करुन तो सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविला जाईल असेही मा. मंत्री महोदयांनी बैठकीत सांगितले.

५. सदरहू बैठकीच्या दिवशी संघटनेचे पदाधिकारी, (१). प्रा. गुलाबराव देशमुख, समन्वयक व अध्यक्ष कृति समिती, महाराष्ट्र कृषी विद्यापीठ, प्राध्यापक संघटना, (२) प्रा. विरेंद्र एस. गोंगे, उपाध्यक्ष आस्टा (३) प्रा. श्रीधर एल. रेवतकर, सचिव, आस्टा, (४) प्रा.एस.डी. देशमुख सदस्य, समन्वय समिती, (५) डॉ.आर.के.राहणे, सहसचिव समन्वय समिती, पूणे हे संघटनेचे पदाधिकारी विनंतीवरुन प्रत्यक्ष मुंबईमध्ये सर्व कागदपत्रांसह उपस्थित राहिले व बैठकीसाठी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची व युक्तीवादाची तयारी करण्याचे कामी आम्हा सदस्यांना त्यांनी मदत केली. सदरहू बैठकीचे कार्यवृत्त शासनातर्फे काढण्यात आले किंवा नाही? हे कळलेले नाही. या बैठकीत काय झाले? याबाबतची विचारणा होत असल्यामुळे ही संक्षिप्त माहिती प्रसृत केलेली आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख, श्री.व्ही.यु.डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे**

***टिप*** *:- मा. कृषी मंत्री यांनी मंत्रालयातील त्यांच्या दालनामध्ये दि. २१ जून, २००४ रोजी दुपारी ५.०० वाजता एक बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीचे निमंत्रण या बुलेटीनच्या पृष्ठ ८४ वर व त्या बैठकीच्या वेळी कृषी विभागाने सादर केलेली टिप्पणी पृष्ठ ८५ वर प्रसृत केलेली आहे.-* ***संपादक***

# निवडश्रेणीमध्ये स्थाननिश्चिती होतांना वरीष्ठ श्रेणीमध्ये पाच वर्षाची सेवा झाली नसेल तर संपूर्ण सेवाकाळ विचारात घेऊन स्थाननिश्चिती देणेबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन, २००४*
*शुक्रवार, दिनांक ११ जून २००४*

**प्रा.बी.टी.देशमुख, व्ही.यू. डायगव्हाणे, वसंतराव खोटरे प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, जी.एल.अैनापुरे** यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे.

"निवडश्रेणीमध्ये स्थाननिश्चिती होतांना वरिष्ठ श्रेणीमध्ये पाच वर्षाची सेवा झाली नसेल तर त्या अधिव्याख्यात्याचा संपूर्ण सेवाकाळ विचारात घेऊन निवडश्रेणीत स्थाननिश्चिती देण्यात यावी" अशी स्पष्ट तरतूद विद्यापीठ अनुदान आयोगाच्या २४ डिसेंबर १९९८ च्या अधिसूचनेच्या परिच्छेद ७.८.० मध्ये असतांना व त्याच आधारावर वित्त विभागाच्या सहमतीने (with the conqurrence of the Finance Department vide their unofficial reference No.23516/SER-10 dated the 4th December, 1999.) निर्गमित झालेल्या ११ डिसेंबर १९९९ च्या उच्च शिक्षण विभागाच्या शासननिर्णयाच्या परिच्छेद १६ मध्ये अशाच प्रकारची तरतूद असतांना, या शासननिर्णयाशी विसंगत आदेश उच्च शिक्षण संचालकांनी आपल्या १४ फेब्रुवारी २००२ च्या पत्रान्वये निर्गमित करणे, ही गोष्ट नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) सचिव व सहसचिव यांनी ५ मार्च २००४ रोजी किंवा त्या दरम्यान सहसंचालक, उच्च शिक्षण अमरावती यांचेमार्फत एक निवेदन उच्च शिक्षण संचालकांना सादर करुन लक्षात आणून दिल्यावर आपल्या परिपत्रकातील चूक आपल्या पातळीवर दुरुस्त न करता दिनांक ८ एप्रिल २००४ च्या पत्रान्वये कारण नसतांना प्रकरण शासनाकडे व विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविण्याची उच्च शिक्षण संचालकांनी घेतलेली भूमिका, शासननिर्णयाप्रमाणे पात्र असलेल्या शेकडो शिक्षकांना उच्च शिक्षण संचालकांच्या या शासन निर्णयाशी विसंगत भूमिकेमुळे वरिष्ठ श्रेणीपासून वंचित रहावे लागणे, त्यामुळे या शिक्षकात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया"

**श्री. जयदत्त क्षीरसागर, मंत्री उच्च शिक्षण, यांचे निवेदन**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक २४.१२.१९९८ च्या अधिसूचनेत परिच्छेद ७.८.० मध्ये खालील प्रमाणे तरतूद करण्यात आली आहे. तीच तरतूद दिनांक ११.१२.१९९९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद १६ मध्ये अंतर्भूत करण्यात आली आहे.

"If the number of years required in a feeder cadre are less than those stipulated in this notification thus entailing hardship to those who have completed more than the total number of years in their entire service for elegibility in the cadre may be placed in the next higher cadre after adjusting the total number of years."

उपरोक्त तरतूद ही प्राध्यापक पदोन्नतीसाठी आवश्यक असलेल्या अटी व शर्ती पैकी एक अट आहे. त्यामुळे ती अधिव्याख्यात्यांच्या करिअर ॲडव्हान्समेंट योजनेसाठी लागू होत नाही. करिअर ॲडव्हान्समेंट योजनेसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक २४.१२.१९९८ च्या परिच्छेद ७.०.० मध्ये अटी व शर्ती दर्शविलेल्या आहेत. त्याच अटी व शर्ती शासनाने दिनांक ११.१२.१९९९ च्या शासन निर्णयात परिच्छेद १२ मध्ये अंतर्भूत केल्या आहे. त्या अनुषंगाने (दिनांक ११.१२.१९९९) संचालकांनी दिनांक १४.२.२००२ चे परिपत्रक सर्व कुलसचिवांना निर्गमित केले आहे. ही तरतूद अधिव्याख्यात्यांना वरिष्ठश्रेणी निवडश्रेणीसाठी पात्र ठरविण्यासाठी आहे. या ठिकाणी अधिव्याख्यात्यांना वरच्या पदावर पदोन्नती न देता त्यांना फक्त त्याच पदाकरिता वरिष्ठश्रेणी/निवडश्रेणी देण्यात येऊन त्यांची त्या श्रेणीमध्ये स्थाननिश्चिती केली जाते.

३. करिअर ॲडव्हान्समेंट ही योजना फक्त अधिव्याख्यात्यांनाच लागू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत अधिव्याख्यात्यांना पदोन्नती न मिळता त्याच पदावर वरिष्ठश्रेणी मध्ये स्थाननिश्चिती केली जाते व त्या त्या श्रेणीतील वेतनश्रेण्या संबंधितांना लागू करण्यात येतात.

४. शासन निर्णय दुरुस्त करण्याचे अधिकार शासनास असल्यामुळे जो पर्यंत दिनांक ११.१२.१९९९ च्या शासन निर्णयात दुरुस्ती करीत नाही तो पर्यंत संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे दुरुस्ती करू शकणार नाहीत. सबब त्यांनी वरिष्ठश्रेणी मधून निवडश्रेणी मध्ये जाण्यासाठी सरसकट वरिष्ठश्रेणी पाच वर्षाची सेवा आवश्यक ठरविणारे आदेशात बदल करण्याच्या संदर्भात शासनास प्रस्ताव सादर केला आहे. त्यावरोबर विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ९.१०.२००३ च्या पत्रान्वये प्रधानसचिव, उच्च शिक्षण, केरळ राज्य यांना कळविलेल्या स्पष्टीकरणाची प्रत पाठविली आहे. ती पुढील प्रमाणे आहे. The lecturers who got promotions/ placement as lecturer senior scale after completion of 8 years service are eligible for promotion as a lecturer (Selection grade) on completing of total 11 years service i.e. without completing 5 years service as lecturer (Senior Scale) या विषयी संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक १७ मे, २००४ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगास पत्र लिहून विचारणा केली आहे. त्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाकडून खुलासा प्राप्त होताच कार्यवाही करण्यात येईल.

*****

## वरिष्ठ श्रेणीतून निवडश्रेणीत स्थाननिश्चिती देतांना शासननिर्णयाच्या विरोधात उच्च शिक्षण संचालकांनी काढलेले परिपत्रक

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन, २००४*
*बुधवार, दिनांक २ जून २००४*

**(५) * ४१७५४ प्रा. बी. टी. देशमुख, श्री. व्हि.यू.डायगव्हाणे, श्री. प.म.पाटील, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री. जी. एल. अैनापूरे, श्री. मखराम पवार** : सन्माननीय उच्च शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निवडश्रेणीत स्थाननिश्चिती करतांना वरिष्ठ श्रेणीमध्ये ५ वर्षाची सेवा झालेली नसली तरी एकूण सेवाकाळ विचारात घेऊन स्थाननिश्चिती करा अशी स्पष्ट तरतुद वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित केलेल्या दिनांक ११.१२.१९९९ च्या शासन निर्णयात असतांना वरिष्ठ श्रेणीची ५ वर्षे सेवा सक्तिची करणारे परिपत्रक उच्च शिक्षण संचालक यांनी दिनांक १४ फेब्रुवारी २००२ रोजी काढल्याने अनेक शिक्षक निवडश्रेणीपासून वंचित राहिले अशी तक्रार करणारे एक निवेदन नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या सचिव व सहसचिवांनी दिनांक ५ मार्च २००४ रोजी किंवा त्यादरम्यान संचालक उच्च शिक्षण यांना, सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग, अमरावती यांचेमार्फत, सादर केले हे खरे आहे काय ;

(२) विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक २४ डिसेंबर १९९८ च्या नोटीफिकेशनद्वारे व त्यानंतर अशाच सूचना वारंवार दिल्याची बाबसुध्दा या निवेदनाने शासनाच्या लक्षात आणून दिलेली आहे हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, सदरहू तक्रारीच्या निवारणार्थ काय उपाययोजना करण्यात आलेली आहे ;

(४) उपाययोजना करण्यात आलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयदत्त क्षीरसागर** : (१) होय.

(२) होय.

(३) व (४) प्रश्न भाग-१ मध्ये नमूद केलेले निवेदन संघटनेने संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दिले आहे. सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने संचालकांनी विद्यापीठ अनुदान आयोगास दि.१७-५-२००४ च्या पत्रान्वये केरळ राज्यातील अधिव्याख्यात्यांना देण्यात आलेले फायदे या राज्यातील अधिव्याख्यात्यांना लागू करण्याबाबत मार्गदर्शन करण्याची विनंती केली आहे. संचालकांनी विद्यापीठ अनुदान आयोगास लिहिलेले पत्र या विभागास दि.२४-५-२००४ रोजी प्राप्त झाले असून विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून स्पष्टीकरण प्राप्त होताच आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

*****

## MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS

University Club House, B Road, Churchgate, Bombay-400 020.

### महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या दिनांक ४ जुलै २००४ रोजी झालेल्या बैठकीत पुढील ठराव मंजूर करण्यात आला.

### *वरिष्ठ श्रेणीतून निवडश्रेणीत स्थाननिश्चिती देतांना शासननिर्णयाच्या विरोधात उच्च शिक्षण संचालकांनी काढलेले परिपत्रक*

**(अ)**

**ज्याअर्थी** निवडश्रेणी देतांना वरिष्ठ श्रेणीत ५ वर्षे सेवा झाली नसेल तर एकूण सेवा लक्षात घेऊन निवडश्रेणीत स्थाननिश्चिती करावी अशी स्पष्ट तरतुद ११ डिसेंबर १९९९ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद १६ मध्ये नमुद आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या २४ डिसेंबर १९९८ च्या नोटीफीकेशनच्या परिच्छेद ७.८ मध्ये सुद्धा तसा स्पष्ट उल्लेख आहे. "जुन्या योजनेत एका श्रेणीतुन दुसऱ्या श्रेणीत जाण्याचा कालावधी मोठा होता तो आता कमी झाल्यामुळे सुरुवातीच्या संक्रमण काळात अशी स्थिती येवू शकते." असा स्पष्ट खुलासाही विद्यापीठ अनुदान आयोगाने २४ डिसेंबर १९९८ च्या नोटीफीकेशनमध्येच केलेला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने ९ ऑक्टोबर २००३ च्या पत्रान्वये ही भूमिका पुन्हा स्पष्ट केलेली आहे. असे असतांना "त्याची निवडश्रेणीमधील स्थाननिश्चिती मात्र ..... वरिष्ठ श्रेणीत ५ वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतरच करण्यात येईल." असे मुळ शासन निर्णयाशी (११.१२.१९९९) संपूर्णपणे विसंगत व विरोधी आदेश असलेले एक परिपत्रक शिक्षण संचालक उच्च शिक्षण यांनी दिनांक १४ फेब्रुवारी २००२ रोजी निर्गमित केलेले असून त्यामुळे अनेक शिक्षकांना या लाभापासून वंचित रहावे लागले आहे, आणि;

**ज्याअर्थी** बुधवार, दिनांक २ जून २००४ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक ४१७५४ च्या निमित्ताने महाराष्ट्र विधानपरिषदेत पुढील प्रमाणे प्रश्नोत्तरे झाली :-

"(५) * ४१७५४ **प्रा. बी. टी. देशमुख, श्री. व्हि.यू.डायगव्हाणे, श्री. प.म.पाटील, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री. जी. एल. अैनापूरे, श्री. मखराम पवार** : सन्माननीय उच्च शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निवडश्रेणीत स्थाननिश्चिती करतांना वरिष्ठ श्रेणीमध्ये ५ वर्षाची सेवा झालेली नसली तरी एकूण सेवाकाळ विचारात घेऊन स्थाननिश्चिती करा अशी स्पष्ट तरतुद वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित केलेल्या दिनांक ११.१२.१९९९ च्या शासन निर्णयात असतांना वरिष्ठ श्रेणीची ५ वर्षे सेवा सक्तिची करणारे परिपत्रक उच्च शिक्षण संचालक यांनी दिनांक १४ फेब्रुवारी २००२ रोजी काढल्याने अनेक शिक्षक निवडश्रेणीपासून वंचित राहिले अशी तक्रार करणारे एक निवेदन नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या सचिव व सहसचिवांनी दिनांक ५ मार्च २००४ रोजी किंवा त्यादरम्यान संचालक उच्च शिक्षण यांना, सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग, अमरावती यांचेमार्फत, सादर केले हे खरे आहे काय ;

(२) विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक २४ डिसेंबर १९९८ च्या नोटीफिकेशनद्वारे व त्यानंतर अशाच सूचना वारंवार दिल्याची बाबसुध्दा या निवेदनाने शासनाच्या लक्षात आणून दिलेली आहे हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, सदरहू तक्रारीच्या निवारणार्थ काय उपाययोजना करण्यात आलेली आहे ;

(४) उपाययोजना करण्यात आलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयदत्त क्षीरसागर** : (१) होय.

(२) होय.

(३) व (४) प्रश्न भाग-१ मध्ये नमूद केलेले निवेदन संघटनेने संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दिले आहे. सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने संचालकांनी विद्यापीठ अनुदान आयोगास दि.१७-५-२००४ च्या पत्रान्वये केरळ राज्यातील अधिव्याख्यात्यांना देण्यात आलेले फायदे या राज्यातील अधिव्याख्यात्यांना लागू करण्याबाबत मार्गदर्शन करण्याची विनंती केली आहे. संचालकांनी विद्यापीठ अनुदान आयोगास लिहिलेले पत्र या विभागास दि.२४-५-२००४ रोजी प्राप्त झाले असून विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून स्पष्टीकरण प्राप्त होताच आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल." आणि;

**ज्याअर्थी** उच्च शिक्षण संचालकांनी व राज्य शासनाने ही बाब अकारण का होईना विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविली आहे;

**त्याअर्थी** विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या दि. ९ ऑक्टोंबर २००३ रोजीच्या प्रधान सचिव उच्च शिक्षण, केरळ राज्य यांना पाठविलेल्या पत्रात जी भूमिका पुढील शब्दात स्पष्ट केलेली आहे :-

"I am directed to inform you that as per clause 7.8.0 of UGC Notification No.F3-1/ 94 (PS) dated 24-12-1998 the Lecturers who got promotion/ placement as Lecturer (Senior scale) after completion of 8 years service, are eligible for promotion as Lecturer- (Selection grade) on completing of total 11 year service i.e., without completing 5 years service as Lecturer (senior scale)." तशीच ती महाराष्ट्र शासनाला तातडीने पत्र पाठवून स्पष्ट करावी अशी विनंती ही सभा विद्यापीठ अनुदान आयोगास करित आहे.

**(ब)**

पत्रव्यवहाराने किंवा आवश्यकता वाटल्यास युजीसीच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष यांची प्रत्यक्ष भेट घेऊन ही कार्यवाही पार पाडावी असेहि ठरविण्यात येत आहे.

*नागपूर विभाग शिक्षक मतदार संघ*

### नुटा व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने जिल्हानिहाय प्रचार सभांचे आयोजन

## सभेची सूचना

नागपूर विभाग शिक्षक मतदार संघामध्ये येत्या ऑक्टोबर - नोव्हेंबर २००४ मध्ये होणाऱ्या निवडणुकीसाठी श्री.व्ही.यु.डायगव्हाणे यांना विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने अधिकृत उमेदवार म्हणून उभे केले असून नुटाने त्यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला आहे. या निवडणुकीच्या प्रचार मोहिमेचा भाग म्हणून नुटा व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने जिल्हावार प्रचार सभांचे आयोजन करण्यात आले आहे.

या जिल्हावार प्रचार सभांच्या निमित्ताने महाविद्यालयीन, कनिष्ठ महाविद्यालयीन, माध्यमिक शिक्षकांची व इतर शिक्षक मतदारांची सभा खाली दिलेल्या वेळी, दिवशी व ठिकाणी बोलाविलेली आहे. या सभेला उभय संघटनांचे ज्येष्ठ नेते उपस्थित राहून मार्गदर्शन करतील.

सभेमध्ये मुख्यत्वे करून पुढील बाबीवर चर्चा होईल. :-

१) संघटनात्मक व व्यावसायिक बाबी. २) निवडणूकीशी संबंधित धोरणात्मक बाबी व आता पावेतो मतदार संघामध्ये झालेल्या नोंदणीचा तालुकावार आढावा घेणे. ३) आपआपल्या तालुक्यामध्ये कोणते नवीन मतदान केंद्र वाढवून मागावे याबाबतच्या प्रश्नावर चर्चा करणे. ४) निवडणूक प्रचाराच्या दृष्टीने आखणी करणे.

आपण या सभेला अवश्य उपस्थित रहावे ही विनंती.

आपले नम्र,
जिल्हा/तालुका/स्थानिक पदाधिकारी नुटा/विदर्भ मा. शिक्षक संघ

सभेचे ठिकाण :-
सभेचा दिनांक :-
सभेची वेळ :-

# NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

From : **Prof. Dr. E.H.Kathale,** Secretary, NUTA, N, 162, Reshimbagh, Nagpur. Dated : 30.6.2004

## लक्षवेधी सूचनेमुळे पी.डब्ल्यु.एस. महाविद्यालयातील ९ प्राध्यापकांची स्थाननिश्चितीची प्रलंबीत प्रकरणे निकाली निघाली.

**वृत्तपत्र निवेदन**

पी.डब्ल्यु.एस. महाविद्यालयातील ९ प्राध्यापकांची स्थाननिश्चितीची प्रलंबीत प्रकरणे सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर विद्यापीठ नागपूर यांच्या आडमुठ्या धोरणामुळे जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवण्यात आलेली होती. नागपूर विद्यापीठ निर्देश क्रमांक ४५ नुसार निर्धारित प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्यानंतरही निरनिराळी अवाजवी कारणे दर्शवून ही प्रकरणे प्रलंबित ठेवण्यात येत असल्याचे धोरण सहसंचालकांनी अवलंबिले होते.

स्थाननिश्चितीच्या संदर्भात निवड समितीच्या बैठकांना सहसंचालक किंवा शासकीय प्रतिनिधी अनुपस्थित असतांनाही निवड समितीच्या कार्यवृत्तावर शासकीय प्रतिनिधीची स्वाक्षरी नाही असा तर्क विसंगत आक्षेप सहसंचालकांनी घेतलेला होता.

नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाचे (नुटा), सचिव डॉ.एकनाथ कठाळे यांनी १ एप्रिल २००४ व २६.४.२००४ रोजी संचालक (उच्च शिक्षण) यांचेकडे निवेदने पाठवून ही प्रकरणे निकालात काढावी अशी विनंती केलेली होती. त्याचप्रमाणे दिनांक ५.५.२००४ रोजी सहसंचालकाच्या कार्यालयापुढे नुटाच्या वतीने निदर्शनेही करण्यात आली होती. तथापि सहसंचालकांच्या आडमुठ्या धोरणामुळे ही प्रकरणे निकाली न निघाल्यामुळे नुटाचे अध्यक्ष आमदार प्रा.बी.टी.देशमुख यांनी विधानपरिषदेच्या नुकत्याच झालेल्या अधिवेशनात नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचनेद्वारे या प्रकरणाकडे शासनाचे लक्ष वेधले. त्यामुळे सहसंचालकांनी ही प्रकरणे तावडतोब निकाली काढली त्याचप्रमाणे आमदार प्रा.बी.टी.देशमुख यांचे लक्षवेधीला उत्तर देतांना शासनाद्वारे नागपूर विभागात महाविद्यालयाकडून प्राप्त झालेली सर्व स्थाननिश्चिती प्रकरणे निकाली काढण्यात आली असल्याचे व उरलेल्या पाच महाविद्यालयाची प्रलंबीत प्रकरणेही तात्काळ निकाली काढण्यात येत असल्याचे निवेदन केल्या गेले.

त्याचप्रमाणे पी.डब्ल्यु.एस. महाविद्यालयाचे प्रस्तुत प्रकरणी स्थाननिश्चितीच्या बैठकीस सहसंचालक अथवा त्यांचे प्रतिनिधी निवड समितीच्या बैठकीस उपस्थित नसतांनाही त्यांनी शासकीय प्रतिनिधीची स्वाक्षरी नाही असा आक्षेप घेऊन प्रस्तावास का मान्यता दिली नाही याबाबतचा खुलासाही संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे यांचे मार्फत मागविण्यात आल्याचेही उत्तरात नमूद केले आहे.

आपला विनित,

(डॉ.एकनाथ कठाळे) सचिव, नुटा

* * * * *

## स्थाननिश्चितीच्या बैठकीस शासकीय प्रतिनिधी उपस्थित नसतांना, त्यांची स्वाक्षरी आणा अशी सहसंचालकांनी मागणी करणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : शुक्रवार, दिनांक ११ जून २००४ : दुसरे अधिवेशन, २००४*

**प्रा.बी.टी.देशमुख, व्ही.यू. डायगव्हाणे, वसंतराव खोटरे प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, जी.एल.अैनापुरे** यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

"प्राध्यापकांची वरच्या श्रेणीत स्थाननिश्चिती करण्याची बाब नागपूर विद्यापीठाच्या नियम, परिनियमांनी ठरवून दिलेली असतांना व नागपूर विद्यापीठाच्या परिनियमानुसार याबाबत नेमलेल्या स्थाननिश्चिती समितीचे सदस्य असलेल्या सहसंचालक, उच्च शिक्षण नागपूर विभाग, नागपूर यांनी या समितीच्या बैठकीला अनेकदा उपस्थित न रहाणे, समितीच्या इतर सर्व सदस्यांनी यथोचितरित्या बैठकीमध्ये घेतलेल्या विधिवत निर्णयांची अम्मलबजावणी न करता सहसंचालकांनी व्यक्तिशः एकएका शिक्षकाच्या बाबतीत "समितीच्या अहवालावर शासकिय प्रतिनिधीची सही नाही, शासकिय प्रतिनिधीची प्रथम सही घेऊन या" असे लेखी आदेश देणे, व्यक्तिशः एकएका शिक्षकाने याबाबत 'समाधानकारक' कारवाई केल्यास मागाहून असे एक एक प्रकरण निकाली काढणे, या सर्व गैरप्रकाराबद्दल नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) सचिवांनी सहसंचालक, उच्च शिक्षण नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे दिनांक १ एप्रिल २००४ रोजी व त्यानंतर दिनांक २६ एप्रिल २००४ रोजी निवेदनाद्वारे तक्रार दाखल करणे, दिनांक ५ मे २००४ रोजी सहसंचालक कार्यालयासमोर प्राध्यापकांनी केलेली निदर्शने, ५ मे २००४ रोजीच्या निदर्शनाची २६ एप्रिल २००४ रोजी नोटीस दिलेली असतांना कार्यालयात हजर असून सुद्धा निवेदन न स्विकारता सहसंचालकांनी निघून जाणे, सहसंचालकाच्या या वर्तनामुळे शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया"

### मा. मंत्री, उच्च शिक्षण यांचे निवेदन

विद्यापीठे व संलग्नित अशासकीय महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांना ५ व्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार लागू करण्याबाबतचे आदेश दिनांक ११.१२.१९९९ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. या शासन निर्णयाद्वारे अधिव्याख्याता व तत्सम पदाकरिता शैक्षणिक अर्हता ही विद्यापीठ अनुदान आयोग वेळोवेळी ठरवून देईल त्याप्रमाणे राहील असेही स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच करीअर ॲडव्हान्समेंट योजनेअंतर्गत अधिव्याख्याता (वरिष्ठ श्रेणी) अधिव्याख्याता (निवड श्रेणी) प्रपाठक व प्राध्यापक यांच्या शैक्षणिक अर्हता, पात्रता व इतर सेवाशर्ती या शासन निर्णयात दिल्या आहेत.

२. नागपूर विद्यापीठाच्या नियम, परिनियमानी ठरवून दिलेल्या पद्धतीनुसार महाविद्यालयाकडून प्राध्यापकांच्या वरच्या श्रेणीत स्थाननिश्चिती करण्याकरिता बैठका आयोजित करण्यात येतात. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतुदीनुसार या बैठकीला शासकीय सदस्य म्हणून सहसंचालकांना निमंत्रित करावे अशी तरतुद शासन पत्र क्रमांक एनजीसी १२००/७३३९६१/(१५/००)/ विशि-४, दिनांक १७.४.२००० अन्वये करण्यात आली आहे. परंतु काहीवेळा कार्यालयीन कामाच्या निकडीमुळे सहसंचालकांना अशा बैठकांना उपस्थित राहणे शक्य नसल्यास सहसंचालक आपले प्रतिनिधींना उपस्थित राहण्यास सूचित करतात. कधी कधी काही महाविद्यालयांचे प्राचार्य हे सहसंचालकांची तारीख व वेळ न घेताच किंवा शासकीय प्रतिनिधी न मागता स्थाननिश्चितीची बैठक आयोजित करतात. त्यामुळे सहसंचालकांना बैठकींना उपस्थित राहणे किंवा प्रतिनिधी पाठविणे शक्य होत नाही.

नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) सचिवांनी सहसंचालक, उच्च शिक्षण नागपूर विभाग, नागपूर यांना दिलेल्या दिनांक २६.४.२००४ च्या निवेदनात पी डब्ल्यु.एस. महाविद्यालय, नागपूर येथील ९ प्राध्यापकांच्या स्थाननिश्चिती संबंधात निवड समितीने निर्देश क्रमांक ४५ नुसार कार्यवाही पूर्ण केली आहे. असे असतानाही स्थाननिश्चिती बाबतचे प्रस्ताव सहसंचालकांकडे प्रलंबीत आहेत असे संघटनेने निवेदनात म्हटले आहे. त्याबाबतचे स्पष्टीकरण खालील प्रमाणे आहे.

या तक्रारीबाबत सहसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे नागपूर येथील पी.डब्ल्यु.एस. महाविद्यालयातील ८ शिक्षकांची वरिष्ठ व निवडश्रेणीतील स्थाननिश्चितीची प्रकरणे प्राप्त झाली होती. **सदर प्रकरणे तपासली असता त्यावर शासकीय प्रतिनिधीची स्वाक्षरी आढळून आलेली नाही. असा आक्षेप घेण्यात येऊन ती महाविद्यालयाचे प्राचार्यास पत्र पाठवून सहसंचालकांकडून त्याबाबत विचारणा करण्यात आली ही वस्तुस्थिती आहे.** सहसंचालक कार्यालयातर्फे स्थाननिश्चितीची प्रकरणे ही महाविद्यालयांनी सादर केल्यानुसार तपासून निकाली काढण्यात येतात व त्रुटीची पूर्तता करुन विभागीय सहसंचालक कार्यालयास प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्यानुसार स्थाननिश्चिती करुन त्याप्रमाणे स्थान निश्चितीचे आदेश महाविद्यालयास पाठविण्यात येतात. **प्रस्तुत प्रकरणी स्थाननिश्चितीच्या बैठकीस सहसंचालक अथवा त्यांचे प्रतिनिधी उक्त बैठकीस उपस्थित नसताना, त्यांनी असा आक्षेप घेऊन प्रस्तावास का मान्यता दिली नाही. याबाबतचा खुलासा संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत मागविण्यात आला आहे.**

तसेच नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या प्रतिनिधीनी सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांच्या कार्यालयासमोर दिनांक ५.५.२००४ रोजी निदर्शने केली होती त्याचवेळी मा. आयुक्त, नागपूर विभाग नागपूर यांनी दुरध्वनी वरुन सहसंचालक, उच्च शिक्षण नागपूर विभाग यांना एनसीसी कार्यालयाच्या जागेच्या संदर्भात तात्काळ चर्चेला बोलाविल्यामुळे त्यांना जावे लागले. त्यावेळी मा. आयुक्तांकडे जातांना त्यांनी कार्यालयातील कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांना संघटनेचे निवेदन स्विकारण्याच्या सूचना केल्या होत्या. त्या सूचनेप्रमाणे कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांनी संघटनेचे निवेदन स्विकारले. यावरुन संघटनेचे निवेदन न स्विकारण्याचा सहसंचालकांचा मानस नव्हता हे स्पष्ट होते. **सहसंचालकांच्या कार्यालयातर्फे महाविद्यालयाकडून प्राप्त झालेली सर्व स्थाननिश्चिती प्रकरणे निकाली काढण्यात आली असून फक्त ५ महाविद्यालयांची प्रकरणे प्रलंबीत आहेत ती तात्काळ निकाली काढण्यात येतील.**

*****

*अमरावती विभाग पदवीधर मतदार संघ :* *: नागपूर विभाग शिक्षक मतदार संघ*

# विधान परिषदेसाठी निवडणूक : प्रचार मोहीम

## *नुटा व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने*

## *जिल्हास्तरीय प्रचारसभा*

१) महाराष्ट्र विधानपरिषदेसाठी ऑक्टोबर-नोव्हेंबर २००४ मध्ये अमरावती विभाग पदवीधर व नागपूर विभाग शिक्षक मतदार संघातून निवडणूक होऊ घातलेली आहे. या निवडणुकीसाठी अनुक्रमे नुटाने प्रा.बी.टी.देशमुख यांना व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने श्री.व्ही.यु.डायगव्हाणे यांना अधिकृत उमेदवार म्हणून उभे करण्याचे ठरविले आहे.

२. निवडणूक प्रचार मोहिमेचा भाग म्हणून उभय संघटनांच्या वतीने सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरीय प्रचार सभांचे आयोजन केलेले आहे. कोणत्या जिल्ह्यांची सभा, कोणत्या तारखेला, किती वाजता व कोणत्या ठिकाणी होईल हे खालील तक्त्यामध्ये नमूद केलेले आहे.

३. नागपूर विभागातील जिल्हास्तरीय सभा या सर्व शिक्षक मतदारांच्या सभा असतील तर अमरावती विभागामध्ये पदवीधर मतदारांच्या सभांच्या स्वरूपात या सभांचे आयोजन करण्यात येईल.

४. या सर्व सभांना नुटाच्या वतीने प्रा.बी.टी.देशमुख, डॉ.एकनाथ कठाळे, प्रा.अनिल ढगे, डॉ.डी.यु.पोच्छी, डॉ.ए.जी.सोमवंशी, प्रा.एस.ए.तिवारी, व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने श्री.ना.बा.सपाटे, श्री.प्र.य.दातार, श्री.व्ही.यु.डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री.दत्तात्रय मिर्झापूरे, श्री. लक्ष्मणराव ढोबे, श्री.श्रावण बरडे, श्री.विकास सावरकर, श्री.अरविंद काकड, श्री.राम बारोटे व उभय संघटनांचे जिल्ह्याचे अध्यक्ष व सचिव हे सर्व किंवा त्यातील काही सहकारी उपस्थित राहतील.

### जिल्हास्तरीय प्रचार सभांचा कार्यक्रम दर्शविणारा तक्ता

| अ.नं. व जिल्ह्याचे नांव | बैठकीचा दिवस व दिनांक | बैठकीची वेळ | बैठकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. वर्धा | रविवार, २५.०७.२००४ | सकाळी १०.०० वा. | लोक विद्यालय, एम.सी.व्ही.सी.सभागृह, वर्धा |
| २. चंद्रपूर व गडचिरोली | रविवार, २५.०७.२००४ | दुपारी ४.०० वा. | मातोश्री विद्यालय, तुकूम, ताडोबा रोड, चंद्रपूर |
| ३. नागपूर (शहर व ग्रामिण) | रविवार, ०१.०८.२००४ | सकाळी ११.०० वा. | लक्ष्मीदेवी धिरन कन्या विद्यालय, झाशी राणी चौक, सिताबर्डी, नागपूर. |
| ४. भंडारा व गोंदिया | रविवार, ०१.०८.२००४ | दुपारी ४.०० वा. | जे.एम. पटेल महाविद्यालय, भंडारा |
| ५. बुलढाणा | शनिवार, ०७.०८.२००४ | दुपारी ४.०० वा. | जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा. |
| ६. वाशिम | रविवार, ०८.०८.२००४ | सकाळी १०.०० वा. | श्री.शिवाजी विद्यालय, वाशिम. |
| ७. अकोला | रविवार, ०८.०८.२००४ | दुपारी ४.०० वा. | आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालय, अकोला. |
| ८. यवतमाळ | रविवार, २२.०८.२००४ | सकाळी १०.०० वा. | लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ |
| ९. अमरावती | रविवार, २२.०८.२००४ | दुपारी ४.०० वा. | भारतीय महाविद्यालय, अमरावती |

***टीप :*** *या प्रचारसभा यशस्वी करण्यासाठी जिल्हा शाखा तसेच तालुका व स्थानिक शाखांच्या पदाधिकाऱ्यांनी स्वतंत्रपणे नोटीस काढून सर्व संबंधितांना निमंत्रित करण्याची काळजी घ्यावी. या जिल्हास्तरीय प्रचार सभांसाठी "सभेची सूचना" नागपूर विभागात व अमरावती विभागात कशी असावी याचे प्रारुप याच अंकामध्ये अन्यत्र दिले आहे. त्याप्रमाणे निमंत्रणे स्वतंत्रपणे मुद्रीत किंवा झेरॉक्स करून घ्यावी अशी विनंती आहे.*

अखिल भारतीय विश्वविद्यालय एवम महाविद्यालय शिक्षण महासंघ
**ALL INDIA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANIZATIONS**
*(Regd. under Act. XXI of 1860)*

*403, Nanak Sai Residency, Abids, Lane Opp to Papaji Ka Dhaba, Hyderabad-500 001,*
*Ph. & Fax : 040-24756914 Mobile : 34756914,*
*E-mail: aifucto@rediffmail.com Website : www.aifucto.org*
Dated 15th April 2004

Prof. V.N. Rajasekharan Pillai
Vice Chairman,
University Grants Commission,
Bahadur Shah Zafar Marg,
NEW DELHI - 110 002

Sub :- Meeting with - AIFUCTO

Sir,

Thank you very much for your kind letter dated 7-4-2004. We also thank you for accepting to have a meeting with AIFUCTO delegation on 19-5-2004 at 11.00 a.m.

We request you to discuss the following issues and to arrive at a negotiated settlement.

1. Fixation benefit of Rs. 14,940/- and CAS from 1996.

2. Implementation of Rastogi Committee Recommendations with respect to

a) CAS to Professor in colleges

b) NET/SLET exemption for Ph.Ds.

c) Additional increments for Ph.Ds.

d) Problems of Women Teachers.

e) Pension to University College Teachers who are not covered by pension scheme.

3. Suitable scales for instructors and coaches.

4. Democratic governance of Universities, Model Act of Universities and involvement of affiliated colleges in the appointments of CDC/University Examinations Registrar.

5. Additional increments for M.Phil/M.Litts.

6. Qualifications of Principals.

7. Development grants to colleges.

8. Functioning of Private/Foreign Universities.

9. Creation of continuous consultative mechanism at UGC with AIFUCTO.

10. Status of implementation of new scales/arrears payment/ CAS

**Relevant notes on the issues** is herewith enclosed.

Thanking you Sir,

With kind regards

Yours fraternally,
B. VIJAY KUMAR, General Secretary

***For Relevant notes on the issues : see next page***

# प्रा.बी.टी.देशमुख व श्री.व्ही.यु.डायगव्हाणे यांची उमेदवारी

## नुटा व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या कार्यकारी मंडळाच्या संयुक्त बैठकीतील निर्णय

वर्धा दि. ११.०७.२००४ : नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटाच्या) कार्यकारी मंडळाने विधानपरिषदेसाठी **अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून** संघटनेचे अध्यक्ष **प्रा.बी.टी.देशमुख** यांना अधिकृत उमेदवार म्हणून उभे करण्याचे ठरविले असून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने केलेल्या विनंतीचा विचार करून नुटाच्या कार्यकारी मंडळाने विधानपरिषदेसाठी **नागपूर विभाग शिक्षक मतदार संघातून** विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे अधिकृत उमेदवार **श्री.व्ही.यु.डायगव्हाणे यांना पाठिंबा देण्याचे ठरविले आहे.**

२. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या कार्यकारी मंडळाने **नागपूर विभाग शिक्षक मतदार संघातून श्री.व्ही.यु.डायगव्हाणे** यांना अधिकृत उमेदवार म्हणून उभे केले असून नुटाने केलेल्या विनंतीचा विचार करून अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून नुटाचे अधिकृत उमेदवार **प्रा.बी.टी.देशमुख** यांना पाठिंबा द्यावा असे ठरविले आहे.

३. माजी आमदार व ज्येष्ठ शिक्षक नेते श्री. ना.बा.सपाटे यांच्या अध्यक्षतेखाली दोन्ही संघटनांच्या कार्यकारी मंडळाची संयुक्त बैठक होऊन त्या सभेत पुढील निर्णय जाहीर करण्यात आला. :-

(i) अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून प्रा.बी.टी.देशमुख व नागपूर विभाग शिक्षक मतदार संघातून श्री.व्ही.यु.डायगव्हाणे यांना निवडून आणण्यासाठी उभय शिक्षक संघटनांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी, असे निर्धारपूर्वक ठरविण्यात येत आहे. दोन्ही संघटनांच्या सर्व सभासदांनी, हितचिंतकांनी, चाहत्यांनी व मतदारांनी अमरावती विभाग पदवीधर व नागपूर विभाग शिक्षक मतदार संघातून अनुक्रमे प्रा.बी.टी.देशमुख व श्री.व्ही.यु.डायगव्हाणे यांना प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

(ii) तसेच प्रगतिशील विचारांच्या संघटनांनी आणि सर्व राजकीय पक्षांनी उभय उमेदवारांना पाठिंबा द्यावा, अशी त्यांना विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| **श्री.वसंतराव खोटरे** | **श्री.ना.बा.सपाटे** | **डॉ.एकनाथ कठाळे** |
| *अध्यक्ष, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ* | *संयुक्त सभेचे अध्यक्ष* | *सचिव, नुटा* |

ALL INDIA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANIZATIONS

# RELEVANT NOTES ON THE ISSUES

**1. Fixation benefit of Rs. 14,940/- and CAS from 1-1-1996**

The fixation benefits of Rs. 14,940/- is given to persons who are in the scale of Rs. 3700-5700 as on 1-1-1996 and on completion of five years in the selection grade i.e. after completion of 21 years (18 years with Ph.D. or 20 years with M.Phil.) But as new CAS is applicable only from 27th July 1998 the fixation benefit of Rs. 14,940/- should also be given to the persons entering in to selection Grade Reader Scale up to 27th July 1998. If this benefit is not given, then these persons can get Rs. 14,940/- only after completion of 23 years, where as juniors get after 18 years, as per new norms. This is unjust. Therefore, we request you to give the fixation benefit of Rs. 14,940/-, for those persons who enter in to selection grade upto 27-7-1998 and not to restrict only up to 1-1-1996. On 9-1-2004, in our meeting with JS(HE) we were informed the matter shall be settled after discussion with UGC.

In a tripartite meeting of MHRD/UGC/AIFUCTO on 6-10-99, it was agreed that if in 1986 CAS is implemented from 1-1-1986, it shall be considered to implement new CAS from 1-1-1996. But no discussion taken place so far on this issue.

**2. a) CAS to Professor in colleges**

It is very unfortunate that UGC has withdrawn Professor in CAS in colleges. It may not be out of place to remind you that.

1) Rastogi review Committee has not differentiated Universities and colleges in respect of CS Promotions to Professor.

2. As per UGC report for the year 1999-2000, 90% of UG Students, 55% of PG Students and 10% Research Students are in affiliated colleges. This implies that bulk of the students and teachers in higher education are in affiliated colleges. Denial of CAS to professor in colleges is a denial to majority of the teachers in higher education system.

3) Some of the best teachers/researchers in higher education system are in affiliated colleges. As an example we can state that MMH College, Gaziabad, has produced about 450 Ph.Ds, some of whom became Professors in different

### संघटकांना विनंती

*या सभेची नोटीस काढणे व सभेचे आयोजन करण्याची जबाबदारी स्थानिक, तालुका व जिल्हा युनिटच्या पदाधिकाऱ्यांनी पार पाडावी अशी अपेक्षा आहे व तशी त्यांना विनंती आहे. सभेच्या नोटीसची प्रत याच पृष्ठावर खाली प्रसृत केलेली आहे. त्यावर सभेचे ठिकाण, तारीख व वेळ कृपया नमूद करावी. गरज वाटल्यास जादा प्रति झेरॉक्स पद्धतीने किंवा चक्रमुद्रण वा मुद्रण पद्धतीने आपणास काढून घेता येतील. सर्व संबंधीताना ही नोटीस मिळेल याची काळजी घ्यावी ही विनंती आहे. -* ***संपादक***

*अमरावती विभाग पदवीधर मतदार संघ*

## नुटा व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने जिल्हानिहाय प्रचार सभांचे आयोजन

# सभेची सूचना

अमरावती विभाग पदवीधर मतदार संघामध्ये येत्या ऑक्टोबर - नोव्हेंबर २००४ मध्ये होणाऱ्या निवडणुकीसाठी प्रा.बी.टी.देशमुख यांना नुटाने अधिकृत उमेदवार म्हणून उभे केले असून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने त्यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला आहे. या निवडणुकीच्या प्रचार मोहिमेचा भाग म्हणून नुटा व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने जिल्हावार प्रचार सभांचे आयोजन करण्यात आले आहे.

या जिल्हावार प्रचार सभांच्या निमित्ताने महाविद्यालयीन, कनिष्ठ महाविद्यालयीन, माध्यमिक शिक्षकांची व इतर पदवीधर मतदारांची सभा खाली दिलेल्या वेळी, दिवशी व ठिकाणी बोलाविलेली आहे. या सभेला उभय संघटनांचे ज्येष्ठ नेते उपस्थित राहून मार्गदर्शन करतील.

सभेमध्ये मुख्यत्वे करून पुढील बाबीवर चर्चा होईल. :-

१) संघटनात्मक व व्यावसायिक बाबी. २) निवडणूकीशी संबंधीत धोरणात्मक बाबी व आता पावेतो मतदार संघामध्ये झालेल्या नोंदणीचा तालुकावार आढावा घेणे. ३) आपआपल्या तालुक्यामध्ये कोणते नवीन मतदान केंद्र वाढवून मागावे याबाबतच्या प्रश्नावर चर्चा करणे. ४) निवडणूक प्रचाराच्या दृष्टीने आखणी करणे.

आपण या सभेला अवश्य उपस्थित रहावे ही विनंती.

आपले नम्र,<br>
जिल्हा/तालुका/स्थानिक पदाधिकारी<br>
नुटा/विदर्भ मा. शिक्षक संघ

सभेचे ठिकाण :-

सभेचा दिनांक :-

सभेची वेळ :-

universities of the country and their guides remained as Readers.

4) Some Subjects exist only in affiliated colleges and not as University Teaching Dept. It seems the plea is `Professor' post do not exist in colleges. But even `Reader' post do not exist in colleges and CAS to `Reader' is available in colleges.

AIFUCTO has always maintained that only those teachers who meet he scholarship should be promoted to `Professor' in CAS. We do not want this to be automatic even in Universities. As such we request you to restore `Professor' in CAS in Colleges.

b) NET/SLET exemption for Ph.Ds.

`Rastogi Committee Report to review the pay scales of University and college teachers' has recommended.

Regarding NET, exemption exists for those who had qualified for M.Phil or submitted the thesis for award to Ph.D. before December 1993. The plea is to extend this provision for doctorate degree holders without any time limit. The points for consideration are as follows : We need to promote research in various areas of knowledge in the country. Promotion of research is crucial for the university system. The employment opportunities for doctoral candidates exist mainly in teaching institutions and research centres. If opportunities for doctoral candidates into academic institutions are made difficult, it will adversely affect the research activities in the higher education system. Not many will opt for full-time research. It must also be conceded that a candidate with a doctoral degree develops abilities to formulate a problem, set out the objectives of investigation, gather data from journals, books and experiments, analyse them properly and finally draw valid conclusions. This means that he/she would have also enquired deeply into a subject and developed an appreciation for scholarly pursuits. All these are valuable assets for an academic. We also have cases where Indians candidates who have qualified for Ph.D. abroad seek placements in teaching institutions in India. Certainly, they would not have passed NET. Hence, by insisting upon it, we would be losing such talent for out education system. The committee has taken into account all these aspects and recommends* that those candidates who have 55% marks in the Master's degree and have obtained a

**सहप्रवासी संघटनांना विनंती :-** अमरावती व नागपूर या दोनही विभागात हे बुलेटीन मिळताच नुटा, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, अमरावती विद्यापीठांतर्गत महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघटना, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठांतर्गत शिक्षकांची 'आस्टा' ही संघटना, आय.टी.आय. निदेशक संघटना, एम.सी.व्ही.सी. शिक्षक व निदेशक यांची संघटना, अमरावती विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचारी संघटना या सहप्रवासी संघटनांचे स्थानिक सर्व पदाधिकारी व सदस्यांनी परस्परांशी आपापल्या स्तरावर एकमेकांशी सहकार्य करुन नोंदणीचे उर्वरित काम व जिल्हा प्रचार सभांचे यशस्वी आयोजन, याबाबतच्या कामाला तत्परतेने सुरुवात करावी, अशी त्यांना विनंती आहे. सहप्रवासी संघटनांचे ज्येष्ठ नेते जिल्हास्तरीय प्रचार सभांना उपस्थित रहातील तशी त्यांना विनंती करण्यात आली आहे. **- संपादक**

## अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातील मतदार नोंदणी

# शेवटचा टप्पा

अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून महाराष्ट्र राज्याच्या विधान परिषदेवर प्रतिनिधी निवडण्यासाठी २००४ साली होणार असलेल्या निवडणुकीसाठी मतदार नोंदणीच्या कामाचा दुसरा टप्पा संपलेला आहे. संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी/संघटकांनी व सहकारी मित्रांनी या टप्प्यामध्ये अतिशय उत्तम रीतीने मतदार नोंदणीचे काम केले. मतदार नोंदणीचे हे काम अजूनही सुरूच आहे. मतदार नोंदणीचा शेवटचा टप्पा आता सुरू झालेला असून या शेवटच्या टप्प्यातील कामाची माहिती करून घेणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने पुढील माहिती सूचनांच्या स्वरूपात कळविण्यात येत आहे.

२. दुसऱ्या टप्प्यात नोंदविण्यात आलेल्या व पात्र ठरलेल्या सर्व पदवीधरांची अंतिम यादी ही १ मार्च २००४ रोजी "पुरवणी एक" च्या स्वरूपात नोंदणी अधिकाऱ्यामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेली होती. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी ही यादी आपल्या संघटकांकडे यापूर्वीच पाठविण्यात आलेली आहे. प्रत्येक भागाची स्वतंत्र यादी कार्यालयातर्फे पुरविण्यात आली होती. प्रत्येक भाग हा बहुधा एका तालुक्याचा बनलेला आहे.

३. आतापावेतो पुरविण्यात आलेल्या यादीमध्ये ८ डिसेंबर २००३ रोजी प्रसिद्ध झालेली मूळ (प्रारुप) यादी व त्याशिवाय १ मार्च २००४ रोजी प्रसिद्ध झालेली 'पहिली पुरवणी' समाविष्ट आहे. मूळ यादीला पुरवणीने काही नावे जोडलेली, काही वगळलेली व काही दुरुस्त केलेली आहेत हे आपल्या लक्षात येईल. पुरवणी एकसह मूळ यादी हीच अंतिम यादी होय.

४. यादी पाहिल्यानंतर कोणाकोणाची नावे यादीमध्ये नाहीत ते आपणास कळून येईल. ज्याचे नाव नाही अशा प्रत्येक पदवीधराकडून नावे यादीत दाखल करून घेण्यासाठी यापूर्वी वापरलेलाच फॉर्म, पण दोन प्रतींमध्ये भरून घ्यावा लागतो.

५. या प्रक्रियेमध्ये तालुका पातळीवर हे फॉर्म्स तहसील कार्यालयामध्ये यापुढे स्वीकारले जाणार नाहीत हे कृपया लक्षात ठेवावे. तालुका पातळीवर एकत्र झालेले फॉर्मस् खाली दिलेल्या पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्यास किंवा व्यक्तिशः सोपविल्यास, आपल्या कार्यालयातून अमरावती येथील मतदार नोंदणी कार्यालयाकडे सोपविल्या जातील किंवा जिल्हा पातळीवरील पदाधिकाऱ्यांकडे पोचविल्यास ते फॉर्मस् योग्यवेळी त्या जिल्ह्याच्या नोंदणी अधिकाऱ्यांकडे छाननी करून पोचविणे सुलभ होईल.

६. नुटा व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या स्थानिक/तालुका व जिल्हा युनिटने ताबडतोब या कामी संयुक्त बैठका घ्याव्यात. इतर समविचारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना सोबत घ्यावे. आवश्यकता वाटल्यास दौऱ्यांचे आयोजन करुन आपल्याकडील सहकारी मित्रांची, आजुबाजूची आपल्या मोहल्ल्यातील किंवा शहरातील/तालुक्यातील समाविष्ट न झालेली पदवीधरांची नावे समाविष्ट करण्याचे काम पुढील पंधरा दिवसामध्ये तातडीने पूर्ण करावे व त्याबाबतचा अहवाल जिल्हास्तरीय प्रचार सभेच्या वेळी त्या सभेत सादर करावा अशी विनंती आहे.

आपला स्नेहाकांक्षी<br>
(एस.ए.तिवारी)<br>
संयोजक, अमरावती विभाग पदविधर मतदार नोंदणी कार्यक्रम<br>
४२, शंकर नगर, अमरावती-४४४ ६०६.<br>
फोन नं. २६७०१३२

**कार्यालयाचा पत्ता :**<br>
नुटा बुलेटीन ऑफीस,<br>
पुंडकर भवन, जैन होस्टेलच्या मागे,<br>
बस स्टँड जवळ, अमरावती.

***कार्यालयीन वेळ :*** *सायंकाळी ६.०० ते ८.००*

Ph.D. after 1993 should also be exempted from qualifying in the NET/SLET to be able to become eligible for the post of a lecturer.

So we request you to reconsider the issue, and exempt all Ph.D. degree holders from NET/SLET.

**c) Additional increments for Ph.Ds**

During the service if a Teacher completes Ph.D they are given two increments. This benefit was also given to the persons who have done their Ph.D. prior to 1996. But this benefit was not given to the persons who joined service with Ph.D. So we request you to give this benefit to the persons who joined service with Ph.D.

**d) Problems of Women Teachers**

Rastogi Committee recommended that breaks in service to the extent of five years can be condoned to women teachers. It also recommended flexi time concept and counting interstate service for pension for women teachers. We request UGC to implement these recommendations.

**e) Pension to University College Teachers who are not covered by Pension Scheme**

Prior to 1973 several Government employees and University and College Teachers were retiring from the service without any pension (Pension Scheme was optional). As per Recommendations of Third Pay Commission, for such of those retired persons who were not covered by any pension scheme, a minimum pension/family pension (Rs. 350/- in those days and presently as per fifth pay commission Rs. 1250/-) was given by the Government of India. Similar benefit was extended by various state governments to their employees, who were not covered by any pension scheme. But unfortunately such benefit was not extended to University and Aided College Teachers as they are not government employees.

Taking this into consideration Rastogi Committee recommended `University Teachers covered by CPF before the introduction of pension scheme an amount equivalent to the DA permissible at the pension level at the minimum of the present (i.e. pre-revised) pay scale be given as DA to them. This would be a small gesture of goodwill for our older generation of teachers who were not given their rightful share for many years. They deserve our gratitude.

We would like to bring to your notice some of such University & Aided College Teachers are facing the crises of poverty. We request you to give suitable orders to implement the Rastogi Committee Recommendations or give a minimum pension to them.

**3. Suitable scales for instructors and coaches.**

In the University system we have posts like instructors and coaches whose scales are not revised. MHRD agreed to revise the scales for instructors and coaches after consulting UGC. There is not improvement in this regard.

**4. Democratic governance of Universities, Model Act of Universities and involvement of affiliated colleges in the appointments of CDC/University Examinations.**

## प्रा.बी.टी.देशमुख निवडणूक निधी समितीचे आवाहन

निवडणूक ही बाब दिवसेंदिवस अधिकाधिक खर्चाची होत आहे, हे आपण जाणताच. अत्यंत काटकसरीने व साधेपणाने निवडणूक लढविण्याचे ठरवूनही काही गोष्टी अपरिहार्य असतात. विशेषतः आपल्या मतदारांशी संपर्क साधणे ही किमान अपेक्षा दुर्लक्षिण्यासारखी नसते. जेथे मतदार चार जिल्ह्यात अत्यंत लहान लहान गावी विखुरलेले असतात तिथे त्यांच्याशी कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्ष का होईना पण संपर्क साधायचा म्हटले की बऱ्याच मोठ्या खर्चाची तरतूद अत्यंत आवश्यक ठरते.

२) संघटनेचे निश्चित व मर्यादित स्वरूपाचे उत्पन्न हे संघटनेच्या कार्यालाच जेमतेम पुरणारे असल्यामुळे या कामात संघटनेकडून खर्चाची अपेक्षा करता येत नाही. **शिवाय तत्वतः सुद्धा या कामासाठी संघटनेच्या निधीतून पैसा खर्च करावयाचा नाही असा नुटाच्या कार्यकारी मंडळाने यापूर्वी घेतलेला निर्णय विचारांती या वेळीही कायम ठेवण्यात आला आहे.**

३) १९८०, १९८६, १९९२ व १९९८ या चारही निवडणुकीमध्ये निवडणूक निधी समितीमार्फत सर्व केंद्रीय व्यवस्था आपली आपण सांभाळली होती व शिवाय आपल्या शहरात, आपल्या गावात आपल्या मतदान केंद्रावरील व्यवस्था सुद्धा आपली आपणच केली होती, तशीच ती आपण याही वेळेला पार पाडू. काळ बराच बदललेला आहे. बाहेर इतर कोणाला हे सांगितले तरी खरे वाटत नाही, असा आजचा काळ. या काळातही हे आपले “वैभव” आपण पूर्ण शक्तीनिशी कायम ठेवू.

४) १६ ते २४ पृष्ठांचे एक लहानसे निवडणूक बुलेटीन प्रत्येक मतदाराकडे पाठविण्याचे ठरविल्यास या कामाचा किमान खर्च आपण कल्पनेने निश्चित करू शकतो. अतिशय साध्या कागदावर जरी काढतो म्हटले तरी अशा बुलेटीनच्या प्रत्येक प्रतीवर होणारा उत्पादन खर्च १० ते १५ रुपये या किमान मर्यादेत ठेवण्याचा प्रयत्न करण्याचे ठरविले तरी ८० हजार मतदारांकडे हे बुलेटीन पाठविण्यासाठी होणाऱ्या खर्चाचा अंदाज आपणास येवू शकतो.

५) यापूर्वी चारही निवडणूकांच्या वेळी आपण आपल्या प्रतिनिधीला निवडणुकीत आर्थिक अडचण भासू दिली नाही. आर्थिक परावलंबनाने चालतांना वाटचालीत शिथिलता येऊ शकते, नको त्या काही मर्यादाही येऊ पाहतात म्हणून निवडणूक खर्चाची संपूर्ण तरतूद आपण यापूर्वी जशी केली तशीच ती यावेळीही करू. यात आपण सारेच कुठेही कमी पडणार नाही, असा निर्धार व आपल्या उज्ज्वल स्वावलंबनाच्या परंपरेला याही वेळी आपण कायम ठेवू असा आत्मविश्वास आपल्या ठिकाणी आहे. आपला प्रतिनिधी, आपल्या शक्तीवरच आपल्याला पाठवावयाचा आहे.

६) नुटाच्या कार्यकारी मंडळाने याबाबत घेतलेल्या निर्णयाप्रमाणे आम्ही आपणास पुढील प्रमाणे विनंती करीत आहोत.

१. सर्व महाविद्यालयीन व जिल्हा नुटा युनिटच्या बैठकी पदाधिकाऱ्यांनी आयोजित कराव्यात अशी त्यांना विनंती आहे.

२. निवडणूक निधी उभारणीबाबत विचार करावा. प्रत्येक प्राध्यापकाने किमान ४०० रुपये या कामासाठी स्वेच्छाधिन सहभाग द्यावा अशी विनंती कार्यकारी मंडळाने सर्व प्राध्यापकांना करण्याचे ठरविले आहे. माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक व इतर सहकारी मित्रांचा या कामांत स्वेच्छाधिन सहभाग मिळेल यासाठी प्राध्यापकांनी प्रयत्न करावेत.

३. उमेदवार सोडून कार्यकारी मंडळाच्या सर्व सदस्यांची निवडणूक निधी समिती स्थापन करण्याचे ठरविण्यात आले आहे. निवडणुकीची आर्थिक बाजू पूर्वीप्रमाणे ही समिती सांभाळेल.

७. महाविद्यालयाच्या नुटा युनिटच्या बैठकीनंतर वरप्रमाणे एकत्र झालेला निधी “**प्रा.बी.टी.देशमुख निवडणूक निधी समिती**” या नावाने रेखांकित धनादेशाव्दारे पाठवावा असेही ठरविण्यात आले आहे. निधी देणाऱ्यांच्या नावाची यादी सोबत पाठवावी. धनादेश रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावा. निधी समितीकडून प्रत्येकाला स्वतंत्रपणे पावत्या पाठविल्या जातील. **धनादेश प्रा.एस.ए.तिवारी**, ४२, **शंकर नगर**, **अमरावती**-४४४ ६०६ **या पत्त्यावर पाठवावा.**

आपले विश्वासू

**डॉ. एकनाथ कठाळे** **प्रा. एस.ए.तिवारी**

In many Universities, senates and syndicates have become nominated bodies. Election component is completely removed. We requested UGC to take steps to reverse this trend. UGC has formulated Model Act of Universities legitimizing the existing evils in Higher Education system. We requested UGC to have a discussion with AIFUCTO on this. As our Universities are of affiliating system, the teachers from affiliated colleges should be involved in the appointments of CDC/University Examinations.

**5. Additional increments for M.Phil/M.Litte.**

At the entry point M.Phil and Ph.D. are treated as additional qualifications and are given as two and four additional increments. But during the service if a person completes Ph.D they are given two and also given a higher start of Rs. 12,840/- when they enter in to Selection Grade/Reader.

In our earlier meetings with MHRD/UGC, we have represented that One increment should be given as and when a person completes M.Phil and a higher start of Rs. 12,420/- be given when they enter into Selection Grade.

**6. Qualifications of Principals**

The qualifications for the post of Principal is, total experience of 10/15 years and a Ph.D or equivalent qualifications.

We request you to exempt the possession of Ph.D. for persons with more than 25 years of service, to be eligible to become the principal of a college.

We draw your attention to the fact that Ph.D is not an essential qualification, for Vice-Chancellor of a University.

**7. Development grants to colleges**

It is desirable to give Development grants to all colleges. UGC should prepare/modify the guide lines in this regard. UGC should also strengthen the regional offices.

**8. Functioning of Private/ Foreign Universities**

In recent years Private/Foreign Universities have started giving advertisements seeking admissions without bothering about any minimum qualifications. No body knows whether such University is existing or not! No body knows whether such University is recognized or not in that country! AIFUCTO demands the ban the functioning of Private/Foreign Universities.

In a tripartite meeting of MHRD/UGC/AIFUCTO on 6-10-1999, Education Secretary observed that Ministry would like to have mutual consultation and dialogue with teachers Federations on continuing basis so that all pending matters could be considered and resolved quickly. In this context, it was resolved that tri-lateral consultative meeting between the Ministry, UGC and teachers Federation may be held periodically so that merits of the issues affecting teaching community could be appraised and appropriate decisions taken for the disposal there of. AIFUCTO requests UGC to have periodic discussions with UGC at least once in three months.

******

## MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS

University Club House, B Road, Churchgate, Bombay-400 020.

**महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या दिनांक ४ जुलै २००४ रोजी झालेल्या बैठकीत पुढील ठराव मंजूर करण्यात आला.**

### १ जानेवारी १९९६ पूर्वी सेवानिवृत्त झालेले (i) प्राध्यापक (ii) असे पी.एच.डी. धारक प्राध्यापक व (iii) १५ वर्षे सेवा झालेले प्राचार्य, १ जानेवारी १९८६ पूर्वी सेवानिवृत्त झालेले प्राध्यापक यांना योग्य सेवानिवृत्ती वेतन न मिळणे

**(अ)** १ जानेवारी १९९६ पूर्वी निवृत्त झालेल्या सदस्यांना रु. १४९४०/- या वाढीव वेतनाचा, तसेच पीएच.डी. धारकांना दोन जादा वेतनवाढी देण्याचा आणि पंधरा वर्षे सेवा झालेल्या प्राचार्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी रू. १६४००-४५०-२०९००-५००-२२४०० चा लाभ सेवानिवृत्तीसाठी दि. १ जानेवारी, १९९६ पासून धरण्याबाबत एक याचिका मुंबई येथे उच्च न्यायालयात दाखल करण्याविषयी सुटाचा (शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ) निर्णय झाला आहे.

(**टिपणी** : सध्या, दि. १ जानेवारी, १९९६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या निवडश्रेणीमधील प्राध्यापकांना रू. १२०००-१६३०० या निवडश्रेणीच्या कमीत कमी टप्प्याच्या, म्हणजेच रू. १२,००० च्या, निम्या रक्कमेवर, म्हणजे रू. ६००० वर सेवानिवृत्तीचा लाभ १-१-१९९६ पासून दिला आहे. पण ज्यांची रू. ३७००-५७०० या जुन्या वेतनश्रेणीत पाच वर्षे सेवा पूर्ण होऊनही वाढीव वेतन रू. १४९४० च्या निम्यावर, म्हणजे रू. ७४७० वर सेवानिवृत्ती वेतन शासनाने मंजूर केलेले नाही, ते करावे, म्हणून याचिका दाखल करण्याचा विचार आहे. तसेच, जे प्राध्यापक पीएच. डी. १ जानेवारी, १९९६ पूर्वीपासून धारण करीत होते, अशा १-१-१९९६ पूर्वी निवृत्त झालेल्या प्राध्यापकांना पीएच. डी.च्या दोन वाढीव वेतनवाढीही दिलेल्या नाहीत; त्याचप्रमाणे, शासन १-१-१९९६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या प्राचार्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी १ ऑक्टोबर, २००० शासन देत नाही. या व इतर अनुषंगिक कारणांसाठी याचिका दाखल करता येईल, "विशेषतः डी. एस. नकारा वि. केंद्र शासन, सुप्रिम कोर्ट केस नंबर ५९३९-५९४१/१९८०, दि. १७ डिसेंबर, १९८२, (१९८३) सुप्रिम कोर्ट केसेस, ३०५, श्री. चंद्रचूड व इतर ४ जजेस, आधारे करता येईल," असे ॲड. मदन फडणीस यांनी मत दिले आहे. तसेच, अशा काही प्राध्यापकांना प्रत्यक्ष रू. १४९४०/- चा सेवानिवृत्तीसाठी लाभ दिलेला देखील आहे, असे दिसते. तुर्तास 'सुटा'ने रु. १०००/- अशा प्राध्यापकाकडून (एकूण ३०) खर्चासाठी घेतलेले आहेत. आपल्याकडील अशा १.१.१९९६ पूर्वी सेवानिवृत्त प्राध्यापकांकडे ह्याबाबत चौकशी तातडीने करावी. ही विनंती.)

**(ब)** १ जानेवारी, १९८६ च्या पूर्वी निवृत्त झालेल्या प्राध्यापकांना सुध्दा १४९४० धरून पेन्शन निश्चित करण्यात आली पाहिजे. अशा प्रकरणात अनेक बाबतीत १२००० रुपये मुळ धरून निवृत्ती वेतन निश्चित करण्यात आले तर अनेक बाबतीत ८००० रुपये मुळ धरून निवृत्ती वेतन निश्चित करण्यात आलेले आहे. हा अन्याय दूर करण्याची बाब सुध्दा याचिके मध्ये दाखल करण्यात यावी.

**(क)** उपरोक्त (अ) अंतर्गत प्रा.संभाजीराव जाधव यांनी मांडलेला प्रस्ताव **महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या दिनांक ४ जुलै २००४ रोजी झालेल्या बैठकीत** विचारात घेण्यात आला. परिच्छेद (ब) त्याला जोडण्याच्या सुधारणेसह तो मंजूर करण्यात आला.

**(ड)** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ व त्याच्या सर्व घटक संघटनांनी अशा सर्व शिक्षकांच्या बैठका घेवून अशा प्रत्येकाचा अर्जदार म्हणून उपरोक्त याचिकेत सहभाग निश्चित करावा असाही निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

# NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

## १ जानेवारी १९९६ पूर्वी सेवानिवृत्त झालेले (i) प्राध्यापक (ii) असे पी.एच.डी. धारक प्राध्यापक व (iii) १५ वर्षे सेवा झालेले प्राचार्य, १ जानेवारी १९८६ पूर्वी सेवानिवृत्त झालेले प्राध्यापक यांना योग्य सेवानिवृत्ती वेतन न मिळणे

उक्त विषयावर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने मंजूर केलेला ठराव पृष्ठ ९५ वर उद्धृत केलेला आहे. १ जानेवारी १९९६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्यांचे सेवानिवृत्ती वेतन कसे निश्चित करावे? हे १५ नोव्हेंबर १९९९ च्या शासननिर्णयाच्या परिच्छेद ४ मध्ये पुढील शब्दात नमूद केले आहे. "....The amount so arrived at will be regarded as consolidated pension/family pension with effect from 1st January 1996. However, in cases where the pension consolidated is treated as the final full pension, it shall not be less than 50% of the **minimum** of the revised scale of pay introduced with effect from 1st January 1996 for the post last held by the Pensioner at the time of his retirement." १ जानेवारी १९९६ पूर्वी निवडश्रेणीत ज्यांनी ५ वर्षे सेवा पूर्ण केली आहे. त्यांच्या स्केलमध्ये त्यांचे **मिनिमम** किती ? हे ११ डिसेंबर १९९९ च्या शासननिर्णयाच्या परिशिष्ट एक मध्ये अनुक्रम नंबर ३ वर पुढील शब्दात सांगितले आहे "The fixation of pay of Lecturers (Selection Grade)/Readers in the pre-revised scale of Rs. 3700-125-4950-150-5700/- who were selected strictly in accordance with the rules and regulations framed by the UGC and who were in position as Lecturers made in a manner that they get their pay fixed at the **minimum** of Rs. 14940/- in the revised scale of Rs.12000-420-18300 as and when they complete five years in the grade." १ जानेवारी १९९६ पूर्वी निवडश्रेणीमध्ये ५ वर्षे सेवा केलेल्या काही अधिव्याख्यात्यांना रुपये १४९४० मूळ वेतन धरून सेवानिवृत्तीवेतन निश्चित केल्याची काही अधिकृत कागदपत्रे संघटनेला मिळाली आहेत. १ जानेवारी १९९६ पूर्वी सेवानिवृत्त झालेले प्राध्यापक व असे पी.एच.डी. धारक, तसेच १५ वर्षाच्या सेवेनंतर निवृत्त झालेले प्राचार्य, व १ जानेवारी १९८६ पूर्वी सेवानिवृत्त झालेले प्राध्यापक यांच्याबाबतीत निवृत्ती वेतन निश्चित करतांना मूळ वेतनश्रेणीचे '**मिनिमम**' चुकीचे धरण्यात आलेले आहे.

**वरील अन्यायाविरुद्ध 'सुटा'ने याचिका दाखल करण्याचा जो निर्णय घेतला आहे त्यात व्यक्तीशः सहभागी होण्याचा विचार करण्यासाठी उपरोक्त स्वरुपाच्या निर्णयाने विपरितरित्या प्रभावित झालेल्या प्राध्यापकांची सभा खाली दिलेल्या स्थळी, वेळी व दिवशी बोलाविण्यात आलेली आहे.**

सभेचा दिवस व दिनांक :- शनिवार, दिनांक १४ ऑगस्ट, २००४

वेळ :- दुपारी ३.०० वाजता

स्थळ :- शिक्षक भवन, अमरावती विद्यापीठ परिसर, अमरावती

नागपूर व अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील अशा सर्व प्राध्यापकांनी या सभेला उपस्थित रहावे अशी विनंती आहे. संघटनेचे पदाधिकारी या बैठकीस उपस्थित राहतील

आपला स्नेहांकित
(डॉ.इ.एच. कठाळे)

*__सूचना__ :- सभेला उपस्थित रहाणाऱ्या प्राध्यापकांनी खालील कागदपत्रांच्या छायाप्रती सोबत आणाव्यात. १) प्राध्यापकाविषयी माहिती :- नांव, महाविद्यालयाचे नांव, विषय, नियुक्तीची तारीख, सेवानिवृत्तीची तारीख, शैक्षणिक गुणवत्ता, निवड श्रेणी मिळाल्याची तारीख, एकूण व निवडश्रेणीतील सेवेचा कालावधी. वय व जन्मतारीख २) पाचव्या वेतन आयोगानुसार मंजूर करण्यात आलेल्या सुधारित पी.पी.ओ. (Revised Pension Payment order) ची छायाप्रत*

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. A.G.Somvanshi, Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1, Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.R. Kalmegh, Lahari Apartment, Keshao Colony, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO.** MAHBIL/ 2001/4448 Licenced to post without prepayment **LICENCE NO. NR/ATI/78/2002** Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **17.07.2004**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

---

To,.......................................................................
.......................................................................
.......................................................................
.......................................................................
.......................................................................